मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले








● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३४ ■ बुधवार, ०६ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


# त्यांनी मृत्यूलाही हरविले : न्यूईरा हॉस्पिटलमध्ये हृदयविकाराच्या झटक्यानंतर ५० मिनिटांनी महिलेला वाचवण्यात डॉक्टरांना यश

## वाशीतील न्युईरा रुग्णालयात ४८ वर्षीय महिलेला मिळाले नवे आयुष्य

## तातडीने सीपीआर (CPR) तसेच अँजिओप्लास्टीद्वारे केले यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : छातीत दुखत असल्याची तक्रार घेऊन वाशीतील न्युईरा हॉस्पीटलमध्ये दाखल झालेल्या ४८ वर्षीय महिलेला अचानक कार्डिॲक अरेस्ट आला आणि जवळपास ५० मिनिटे तिच्या हृदयाचे ठोके पूर्णपणे थांबले होती. मात्र, डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि त्वरित सीपीआर (CPR) आणि अँजिओप्लास्टीमुळे तिचे प्राण वाचवण्यात यश आले. या घटनेमुळे तिला अक्षरशः नवे आयुष्य मिळाले.

वाशीतील गृहिणी मेहरबी यांना २–३ तासांपासून छातीत दुखणे,* अस्वस्थता जाणवणे आणि अतिप्रमाणात घाम येणे अशा तक्रारी सतावत होत्या, जे हृदयविकाराच्या झटक्याची (हार्ट अटॅक) लक्षणं मानली जातात. जेव्हा त्या रुग्णालयात दाखल झाल्या तेव्हा सुरुवातीला त्यांचे ऱ्हदयाचे ठोके आणि रक्तदाब स्थिर होता. त्यानंतर तात्काळ ईसीजी (ECG) करून आवश्यक औषधोपचार सुरू करण्यात आले.

काही मिनिटांतच त्यांची प्रकृती अचानक खालावली. त्या बेशुद्ध पडल्या आणि ऱ्हदयाचे ठोके व रक्तदाब पूर्णपणे बंद पडला,म्हणजेच त्यांना कार्डिॲक अरेस्ट आला. यावेळी प्रसंगावधान राखत तात्काळ सीपीआर सुरू करण्यात आला. रुग्णाला इंट्यूबेट करून व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. दरम्यान, मॉनिटरवर जीवघेणा व्हेंट्रिक्युलर टॅकिकार्डिया (VT) असा हृदयाचा अनियमित ठोका दिसून आला. डॉक्टरांनी अनेक वेळा डीसी शॉक (defibrilla-tion) दिले तसेच आपत्कालीन औषधं दिली.

गंभीर परिस्थिती असूनही डॉक्टरांच्या टीमने जवळपास ४५ ते ५० मिनिटे अखंड सीपीआर सुरू ठेवला. अखेर रुग्णाच्या ऱ्हदयाचे ठोके आणि रक्तदाब पुन्हा सुरू झाले. त्यानंतरही तिला ट्रिपल इनोट्रोपिक सपोर्टची गरज होती.

या प्रकरणाबाबत माहिती देताना *डॉ. गौरव सुराणा(ऱ्हदयविकार तज्ज्ञ, न्यूईरा हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई) यांनी सांगितले की,* हे अत्यंत गंभीर प्रकरण होते, ज्यात प्रत्येक सेकंद महत्त्वाचा होता. रुग्ण १५ एप्रिल २०२६ रोजी दाखल झाला होता. सुरुवातीला हार्ट अटॅकची लक्षणे दिसत होती, जी बहुधा कोरोनरी आर्टरीतील अडथळ्यामुळे झाली होती. अशा परिस्थितीत



हृदय प्रभावीपणे रक्त पंप करणे थांबवते आणि तातडीची मदत हाच जीव वाचवण्याचा एकमेव मार्ग असतो.

ते पुढे सांगतात की सीपीआरमुळे मेंदूसह महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा सुरू ठेवता येतो. हृदयाचे ठोके अनियंत्रित झाल्यास, हृदय पुन्हा सामान्य लयीत (Normal Rhythm) आणण्यासाठी छातीवर दिला जाणारा विजेचा धक्का अशावेळी फायदेशीर ठरतो. जवळपास ५० मिनिटे चाललेले सीपीआर अत्यंत दुर्मिळ असून, योग्य वेळी सीपीआर आणि शॉक दिल्यामुळे रुग्णाचा जीव वाचविणे शक्य झाले.

रुग्ण स्थिर झाल्यानंतर तिला व्हेंटिलेटर आणि इनोट्रोपिक सपोर्टवर ठेवण्यात आले. त्यानंतर लगेचच कॅथ लॅबमध्ये नेऊन कोरोनरी अँजिओग्राफी करण्यात आली. यात हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला. अशावेळी तातडीने अँजिओप्लास्टी करून रक्तपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

डॉ. सुराणा म्हणाले,अशा प्रकरणांमध्ये वेळीच उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे असते. उशीर झाल्यास कायमस्वरूपी नुकसान किंवा मृत्यू होऊ शकतो. अँजिओप्लास्टीनंतर रुग्णाची प्रकृती हळूहळू सुधारू लागली आणि काही दिवसांत सपोर्ट कमी करता आला.

उपचारानंतर रुग्णाला अतिदक्षता विभागात (ICU) ठेवण्यात आले. पुढील दोन दिवसांत तिची प्रकृती स्थिर झाली. इनोट्रोपिक सपोर्ट कमी करण्यात आला आणि तिला व्हेंटिलेटरवरूनही यशस्वीरीत्या काढण्यात आले. तिसऱ्या दिवशी ती स्वतः उभी राहू लागली. चौथ्या दिवशी तिला वॉर्डमध्ये हलवण्यात आले. सहाव्या दिवशी, म्हणजेच २२ एप्रिल २०२६ रोजी, तिला पूर्णपणे स्थिर अवस्थेत घरी सोडण्यात आले.

अशा प्रकरणांमध्ये वेळीच उपचार न मिळाल्यास मेंदूला ऑक्सिजनचा अभाव, हृदयाच्या कार्यक्षमतेचे कायमस्वरूपी नुकसान , वारंवार व्हेंट्रिक्युलर टॅकिकार्डियाचे झटके, न्यूरोलॉजिकल समस्या किंवा मृत्यू होण्याचा धोका वाढतो असे तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

हा प्रसंग आमच्यासाठी अत्यंत गंभीर होता. आम्ही तिला जवळपास गमावलेच होते. पण डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी हार मानली नाही. तिचे बरे होणे आमच्यासाठी एका चमत्कारासारखेच आहे. आम्ही संपूर्ण टीमचे मनापासून आभारी आहोत अशी प्रतिक्रिया रुग्णांच्या कुटुंबियांनी व्यक्त केली.

रुग्णालयाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी सांगितले, वेळीच वैद्यकीय मदत, आधुनिक उपचार आणि आपत्कालीन यंत्रणेमुळे अत्यंत गंभीर परिस्थितीतही एखाद्याचा जीव वाचवता येतो. आजकाल कमी वयातही हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे लक्षणे ओळखून तातडीने उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे.

---

# सामाजिक कार्यकर्ते सुधीर पवार यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल /प्रतिनिधी** : सामाजिक कार्यकर्ते आंबेडकर चळवळीत काम करणारे, युनिव्हर्सल इन्फ्रा होम्स चे संचालक सुधीर पवार यांचा वाढदिवस नवीन पनवेल येथील कार्यालयात प्रमुख मान्यवर, मित्रमंडळी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमाला कामगार नेते शरद कांबळे, उद्योजक अनिल भातणकर, पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे युवा जिल्हाध्यक्ष सचिन



तांबे, आरपीआय पनवेल महानगरपालिका अध्यक्ष प्रभाकर कांबळे, व्याख्याते कुमार मेटांगे, भा.बौ. म. सभा अध्यक्ष सुनील वाघपंजे, युवा अध्यक्ष अक्षय अहिरे, युनिव्हर्सल इन्फ्रा चे संचालक राज सदावर्ते, संजय फडके, सुनील वानखेडे, संतोष गोटे, प्रभाकर सावंत, अमित साळवी, सुशील जाधव, राकेश जाधव तसेच पत्रकार शंकर वायदंडे आदी सर्व मान्यवर उपस्थित होते सर्वांनी आपल्या मनोगतामध्ये सुधीर पवार यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# थोर समाजसुधारक स्व.जनार्दन आत्माराम भगत यांच्या पुण्यतिथी निमित्ताने ७ मे रोजी विविध समाजोपयोगी कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** पंचायत समितीचे माजी सभापती, कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८ व्या पुण्यतिथी निमित्ताने गुरुवार दिनांक ०७ मे रोजी सायंकाळी ०६ वाजता उलवे नोड मध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी कार्यक्रम होणार आहेत. उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर होणाऱ्या या समारंभात विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६"चे बक्षिस वितरण तसेच पनवेल उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार त्याचबरोबरीने शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणिजनांचा पारितोषिक सन्मान समारंभ आणि 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. स्वर्गीय भगतसाहेबांनी अहोरात्र आपला देह 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबदल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्रय व भूक यांच्याबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामूळेच होऊ शकते हे त्यांनी जाणले होते. आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या अंतःकरणात कायम होती. त्याचबरोबर देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. त्यामुळे भगतसाहेबांची कीर्ती अजरामर राहिली आहे. त्यांची जयंती फेब्रुवारी लीप महिन्यामुळे दर चार वर्षांनी असते. त्यावेळी जयंतीनिमित्त राज्यात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीला त्यांच्या नावे बहुमानाचा पुरस्कार दिला जातो. तर दर वर्षी पुण्यतिथीलाही सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करत भगतसाहेबांच्या स्मृतीला अभिवादन करत युवा पिढीला प्रेरणा देण्याचे काम केले जाते.









पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक श्री.सोमीनाथ कोल्हे यांचा वाढदिवसा निमित्त पाटोदा तालुका पत्रकार संघा तर्फे सत्कार करुन शुभेच्छा देताना. पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष शेख अमीर, सचिव अँड.महेश बेदरे, उपाध्यक्ष सचिन गायकवाड, संघटक सतिष गर्जे, उपाध्यक्ष सय्यद रियाज, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती अध्यक्ष शेख अजीज, सोशल मिडीया तालुकाध्यक्ष शेख महेशर, प्रेस फोटोग्राफर संघ तालुकाध्यक्ष सखाराम भोसले, प्रेस फोटोग्राफर संघ कार्याध्यक्ष राहुल सोनवणे सह महासांगवीचे सरपंच नामदेव सानप, अपंग संघटनेचे अशोक दगडखैर व इतर

(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)

# देगलूर येथे मतदान पुनर्निरीक्षण अभियान कार्यशाळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** देगलूर (दि.०५)“सशक्त मतदार यादी,सशक्त लोकशाहीचा निर्धार!”या घोषवाक्याखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधानसभा निहाय ‘मतदार पुनर्निरीक्षण अभियान’(SIR) अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन शनिवारी (दि. २ मे २०२६) देगलूर येथील अशोका हॉटेल पॅलेस येथे करण्यात आले.या कार्यशाळेला भाजपचे प्रदेश महामंत्री तथा माजी आमदार मा.सुनीलजी राणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.प्रदेश सरचिटणीस तथा माजी आ.सुनिल राणे यांनी मतदार यादी शुद्धीकरण,बूथ स्तरावरील अचूक नियोजन,घराघरात जाऊन पडताळणी आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.




दरम्यान आ.जितेश अंतापूरकर यांनी आपल्या मार्गदर्शनात कार्यकर्त्यांनी सजग,सक्षम आणि कृतीशील राहून मतदार पुनर्निरीक्षण अभियान प्रभावीपणे राबवावे,असे आवाहन केले. प्रत्येक बूथवर अचूक माहिती संकलन आणि प्रत्यक्ष संपर्कातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यशाळेला आ.जितेश अंतापूरकर,डॉ.संतुकराव हंबर्डे (जिल्हाध्यक्ष,भाजप नांदेड दक्षिण),लक्ष्मणराव ठक्करवाड,डॉ. माधवराव उच्चेकर,माणिकराव लोहगावे,माधवराव मिसाळे,शंकर कंतेवार (विधानसभा प्रमुख,भाजप), शिवाजीराव देशमुख बळेगावकर,रामराव नाईक,प्रितम देशमुख (तालुकाध्यक्ष,भाजप),अनिल पाटील,शिवकुमार देवाडे,हावगीराव गोपछेडे, अबाराव संगनोड,संजीव पांचाळ,ग्रेडर साहेब,शिवराज हांडे,शंकरराव काळे,दिपक संगमकर,अशोक साखरे,चंद्रशेखर पा.सावळीकर, श्रीकांत धडेले,शिवकांत माळगे,मारोती राहिरे(तालुकाध्यक्ष,भाजप), प्रशांत दासरवार (शहराध्यक्ष, भाजप),शिवराज बोधने (तालुकाध्यक्ष,भाजप),साई रुद्रुरकर(शहराध्यक्ष, भाजप),अशोक डुकरे,संदीप पाटील (भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष),अभय देशमुख,ब्रम्हा कांबळे,नितीन कुडकेकर यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेतून मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे प्रत्येक कार्यकर्ता अधिक सक्षमपणे मैदानात उतरून अभियान यशस्वी करेल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# प्रा.श्याम मानव यांच्या व्याख्यानास नांदेडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/ सय्यद इसा :** अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव यांच्या व्याख्यानाचे आयोजन अनिस व समविचारी पक्षाच्या वतीने नांदेड येथिल कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात ४ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आले होते.

भोंदू बाबा अशोक खरात याच्या सह देशातील अनेक बाबांच्या फसवणूक व महिला शोषण झालेल्या सत्य कथा त्यांनी पुराव्याणीशी आपल्या व्याख्यानात मांडल्या

महिला बाबाच्या नादी का लागतात व कश्या फसतात?, बुआ आणि ज्योतिषी महिलांना कसे फसवतात? कोणती प्रलोभने दिली जातात? शारीरिक व आर्थिक शोषण कसे होते? ढोंगी बाबांना ओळखायचे कसे? जादूटोणा विरोधी कायद्यात बाबावर कारवाई होऊ शकते काय? आदी विषयांवर प्रत्यक्ष भंडाफोड व विविध प्रकरणाचा उहापोह प्रा.मानव सरांनी केला.




व्याख्यान ऐकण्यासाठी हजारोंची गर्दी झाली होती. उदघाट्न अनिस च्या कार्यकर्त्या सुलोचनाताई मुखेडकर यांनी केले तर माकपचे राज्य समितीचे जेष्ठ नेते कॉ.विजय गाभने यांनीही सभेला संबोधित केले.सूत्रसंचालन सीटू राज्य सचिव कॉ.उज्वला पडलवार यांनी केले.

मंचावर राष्ट्रीय भारतीय काँग्रेसचे नेते माजी सनदी अधिकारी एकनाथ मोरे, माजी उप महापौर आंनद चव्हाण,डॉ.सचिन सरोदे,डॉ. विठ्ठल भंडारे, ऍड. कॉ. प्रदीप नागापूरकर प्रा.अनंत राऊत आदी नेतेगन उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. इरवन्त सूर्यकार, प्रा. देविदास इंगळे,दत्ता तुमवाड,प्रा.ग.ना. गोइनवाड, प्रज्ञाधर कांबळे, कॉ. लता गायकवाड,सपना टोमके,डी. एन. मोरे,बालाजी पाटोळे, कॉ.गंगाधर गायकवाड,प्रा. नरेश भिसे,बालाजी गायकवाड,ऍड. सत्यकुमार जाधव,संकेत पाटील आदींनी प्रयत्न केले.सभागृह तुडुंब भरल्यामुळे अनेकांना खाली बसून व दरवाज्याजवळ उभे राहून व्याख्यान ऐकावे लागले.

# महादेव उप्पे यांना महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी: महादेव उप्पे :** देगलूर(दि.०५) मागील अनेक वर्षांपासून पत्रकारीता क्षेत्र असो,सामाजिक क्षेत्र असो किंवा समितीच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करून गोरगरीब जनतेच्या हितासाठी धडपडणाऱ्या देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील महादेव शरणप्पा उप्पे यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार सोहळा ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित राष्ट्रीय पातळीवरील महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार २०२६ चा दि.०२ मे २०२६ रोजी




शिर्डीतील श्री साईबाबा यांच्या पावनभूमीत परिवार लॉन्स बँकेट हॉल न्यू रिंग रोड सिटी मार्केट शेजारी इंडियन पेट्रोल पंप शेजारी मोठ्या दिमाखदार पद्धतीने सोहळा संपन्न झाला असून या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदाम संसारे सर,उपाध्यक्षा विद्या ठाकूर/कुंजीर,कार्याध्यक्ष संजय मोरे, सल्लागार,डॉ. माधव वानखेडे, सरचिटणिस भूषण सरदार, स्वागताध्यक्षा राजनंदिनी अहिरे, कविता वडनेरकर योगीता डांगळे अनिता दिवे प्रिती म्हसदे पायल राजगुरू कविता बाविस्कर मिनाक्षी अहिरे संगिता शिंदे व अन्य सभासदांनी कार्यक्रम उत्तमरित्या पार पाडण्यासाठी जिवाचे रान केले व कार्यक्रम भव्यदिव्य स्वरूपात उत्तमरित्या पार पाडण्यात आले असून या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व साईबाबाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात आली असून समाजसेवक,प्रसिद्ध उद्योगपती, कृषीविषयक क्षेत्रातील कृषीतज्ञ, सिनेसृष्टीतील कलावंत,सुप्रीम कोर्टातील वकील व जेष्ठ विधितज्ञांच्या हस्ते पुरस्कारार्थीना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल माधव काईतवाड बोरगडीकर कार्याध्यक्ष,माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिस मित्र समिती नांदेड,जेष्ठ पत्रकार किशोर आडेकर तालुकाध्यक्ष भिमशक्ती सामाजिक संघटना, बालाजी नाईकवाडे तालूका उपाध्यक्ष मराठी पत्रकार संघ, शिवानंद उप्पे श्रीनिवास बिरादार,नंदकुमार वलकले, उमर मौजम अजिजसाब फारुखी,अनंतकुमार बत्तीनवार , प्रसेनजित दावणगीरकर,ॲड. सद्दाम दावणगीरकर,पत्रकार सतिश वाघमारे,पत्रकार संघपाल मदने,किरण पाटील वझरकर सतिश बिरादार, यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जयभवानी महाविद्यालयाचा विद्यार्थी फाळके रेवण याची मुबंई पोलीस मध्ये निवड

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयाचा बी.एस्सी चा विद्यार्थी फाळके रेवण बंडू याची नुकतीच मुबंई पोलीस भरतीत पोलीस पदावर निवड झाली. त्या बद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयात मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना फाळके




रेवण यांनी सांगितले की महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे अनमोल मार्गदर्शन कामी आले. त्या मुळे लेखी परीक्षेत यश मिळविता आले असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी फाळके रेवण यांनी स्पर्धेच्या काळात युवकापुढे आदर्श निर्माण केला आहे. भविष्यासाठी त्याला शुभेच्छा दिल्या! या सत्कार सोहळ्याचे संचलन प्रा.बाळासाहेब जोशी यांनी केले. तर आभार प्रा. शिवाजी भोरे यांनी मानले या प्रसंगी प्रा.डॉ.सुनिल जाधव, प्रा.सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ.बंडू लोखंडे सह आदिची उपस्थिती होती.

# जासई विद्यालयाचा बारावीचा निकाल ९८.४३ %

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज, जासई हे उरण तालुक्यातील एक नावाजलेले हायस्कूल आहे . दरवर्षी प्रमाणे आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत, शैक्षणिक वर्ष २०२५ -२०२६ मध्ये विद्यालयाचा निकाल ९८.४३ % लागला आहे. यामध्ये विज्ञान शाखेचा निकाल १०० % तर कला शाखेचा निकाल ९६.०७ % टक्के लागला आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे चेअरमन मा. श्री अरुण जगे साहेब,सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य,विद्यालयाच्या प्राचार्या




मा. सौ . के. जी .मॅडम ,उपमुख्याध्यापक श्री कुटे सर ,पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा !!

# नागद ते फर्दापूर रस्त्याच्या कामामुळे उडणाऱ्या धुळीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## प्रशासनाकडून पाणी फवारणी व सुरक्षेची उपाययोजना करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सध्या सुरू असलेल्या नागद सोयगाव फर्दापूर मार्ग क्रमांक १२४ रस्त्याच्या कामामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.कामाच्या ठिकाणी योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे वाहनांच्या हालचालींसोबत धुळीचे ढग हवेत पसरत आहेत.यावेळी घोसला गावातील माजी पोलीस कर्मचारी उत्तम चिंतामण बावस्कर व स्थानिक नागरिकांच्या मते, सकाळपासून संध्याकाळपर्यंत धुळीमुळे श्वसनाचे त्रास,



डोळ्यांची जळजळ,खोकला आणि एलर्जीचे प्रमाण वाढले आहे.विशेषतःलहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.रस्त्याच्या कामादरम्यान पाणी फवारणी न केल्याने परिस्थिती अधिक गंभीर होत आहे.नियमांनुसार बांधकाम स्थळी धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणी टाकणे,तसेच सुरक्षेची उपाययोजना करणे आवश्यक असताना संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी नियमित पाणी फवारणी करावी,तसेच धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाय त्वरित राबवावेत,अशी मागणी जोर धरत आहे. सबंधीत संबंधित ठेकेदाराने तात्काळ उपायोजना न केल्यास जन आंदोलन छेडण्याचा इशारा माजी पोलीस कर्मचारी उत्तम बावस्कर व नागरिकांनी दिलेला आहे.

# मे महिना 'सौर महिना' म्हणून साजरा होणार; महावितरणचा 'पीएम सूर्यघर' योजनेसाठी पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** देशभरात मे २०२६ हा महिना 'सौर महिना' (मंथ ऑफ सोलर) म्हणून साजरा करण्याचे निर्देश केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (महावितरण) 'पीएम सूर्यघर: मोफत वीज योजने'ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कंबर कसली असून राज्यातील सर्व मुख्य अभियंत्यांना यासंदर्भात विशेष सूचना जारी केल्या आहेत.

या मोहिमेचा मुख्य उद्देश जास्तीत जास्त घरांवर सौर पॅनेल बसवून नागरिकांना मोफत विजेचा लाभ मिळवून देणे हा आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत निवासी ग्राहक, गृहनिर्माण सोसायट्या आणि निवासी कल्याणकारी संस्थांमध्ये जनजागृती करून नॅशनल पोर्टलवर नोंदणी वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. ज्या ग्राहकांनी आधीच अर्ज केले आहेत, त्यांच्याकडील सौर यंत्रणा बसवण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रशासकीय स्तरावर कामाला गती देण्यासाठी महावितरणने तपासणी प्रक्रिया (इन्स्पेक्शन) अधिक वेगवान करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सौर यंत्रणा बसवल्यानंतर मिळणारे केंद्राचे अनुदान (CFA) ग्राहकांना वेळेत मिळणे सोपे होईल. तसेच, जास्तीत जास्त स्थानिक विक्रेत्यांना (व्हेंडर्स) नॅशनल पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे, जेणेकरून ग्राहकांना आपल्या आवडीनुसार आणि सोयीनुसार विक्रेते निवडता येतील.

विशेष म्हणजे, मे महिन्यातील कामगिरीच्या आधारे केंद्र सरकारकडून राज्यांचा गौरव केला जाणार आहे. सर्वाधिक अर्ज मिळवणे, सर्वाधिक सौर संच कार्यान्वित करणे आणि वेळेत तपासणी पूर्ण करणे अशा विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या राज्यांना राष्ट्रीय स्तरावर सन्मानित केले जाईल. महावितरणच्या या पुढाकारामुळे राज्यात सौर ऊर्जेचा वापर वाढून पर्यावरण रक्षणासोबतच सर्वसामान्यांचे वीज बिल शून्यावर येण्यास मोठी मदत होणार आहे. नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्या घरांवर सौर यंत्रणा बसवून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कल्याणी सोळंकेने केली खोटी सही मुख्याधिकारी पंकज गावंडेने अजुन एफ.आय.आर.दाखल केला नाही - रजनीकांत बोरेले यांची कार्यवाही करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : पांढरकवडा येथील प्रसिद्ध व्हिसल ब्लोअर आणि माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी नगर परिषद पांढरकवड्याच्या भ्रष्टाचार चव्हाटयावर आणले असून लोखंडी हातगाड़ी खरेदी मामल्यात मुख्याधिकारी यांची बनावटी स्वाक्षरी करुण आर्थिक अपहार करण्याचा कट रजनीकांत बोरेले यांनी माहिती अधिकार अंतर्गत दाखल केलेल्या अपील प्रकरणांतून माहिती प्राप्त करुण उघड़कीस आणले आहे.विस्तृत हकीकत अशी की, पांढरकवडा नगर परिषद स्वछता विभागातील नालीतुन उपसलेला गाळ उचलने करीता हातगाडी (लोखंडी) बनवून पुरवठा करने या करीता कार्यालयीन नस्ती तयार केली हा संपूर्ण भोंगळ कारभार आर्थिक ग़ैरप्रकार करण्याचा कट रचण्याचा हेतुने करण्यात आला होता.या प्रकरणात तत्कालीन व सध्याचे मुख्याधिकारी पंकज गावंडे यांची खोटी व बनावटी स्वाक्षरी करुण खोटे कागद पत्र तयार करुण खरे म्हणुन अमलात आणुन १०,००० रु, प्रति हातगाडी प्रमाणे ३ हातगाडीचे देयक काढ़ण्याचे कट कारस्तानी पूर्ण केली होती. प्रस्तुत तथा कथीत गैप्रकार प्रणात कल्याणी दि.सोळंके,पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता न.प.हिला मुख्याधिकारी पंकज गावंडे याने दि.२३/०१/२०२६ ला करणे दाखवा नोटीस तामील केली त्यात नमूद केले की करनाम्यावर बनावटी/खोटी,स्वाक्षरी करने,कर्तव्यात कसूर करने,फसवूनआणि प्रशासनाचा विस्वासघात करने,सरकारी दस्तावे जावर खोटी सही करने, हा फौजदारी गुन्हा आहे अश्या प्रकारची नोटीस बजविली

पंकज गावंडे च्या दि.२३/०१ च्या नोटिसला कल्याणी दि. सोळंके हिने दि.३१/०१/२०२६ ला उत्तर देत म्हणाली करारनामा मंजूर,कामाचा आदेश,देयकाची टिपणी,देयक मंजूरी पर्यंतची प्रक्रिया आपल्या (मुख्याधिकारी) मंजूरी शिवाय पूर्ण करने शक्यच नाही. कारनामा सुद्धा आपणच केला आहे त्यामुळे मी ( म्हणजे कल्याणी सोळंके) बनावट खोटी स्वाक्षरी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असा खुलासा केला.यावर पंकज गावंडे याने दि.२५/०२/२०२६ चौकशी समिती नेमली यात कल्याणी सोळंके पाणी पुरवठा व स्वछता अभियंता ह्यांनी मुख्याधिकारी यांची बनावट /खोटी स्वाक्षरी केल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आली आहे तेव्हा सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याकरीता चौकशी समिती गठित करण्यात येत आहे चौकशी समितीतील अधिकारी यांनी सखोल चौकशी करुण अहवाल पंकज गावंडे यांचे समक्ष सादर करावा असे आदेश शिवांगी राऊत स्थापत्य अभियंता (प्रमुख) यांचे सह इतर तीन अधिकारी यांना दिले स्मरणात असावे शिवांगी राउत तीच आहे ज्यांनी रजनीकांत बोरेले यांना कलम 8 (1)(h) प्रमाणे माहिती देता येत नसल्याचे कळविले होते नंतर रजनीकांत बोरेले यांचे अपीलच्या दणकयाने माहिती द्यावी लागली होती.हे विशेष पुढे चौकशी समिततील शिवांगी राउत स्थापत्य अभियंता (प्रमुख) सूरज राठोड,सहा. कर निरिक्षक (सदश्य) संतोष चवरे,लेखपाल (सदश्य),विकास अकुलवार,अस्थापना विभाग प्रमुख (सदश्य),यांनी सखोल चौकशी अहवाल मुख्याधिकारी पंकज गावंडे यांचे कडे दि.२७/०३/२०२६ ला सादर केला त्यात नमूद आहे की, रक्कम रु.५०० रू.मूल्याचा स्टेम्प पेपरवर कामाचा करारनामा करुण घेतला व दि.०३/११/२०२५ रोजी कामाचा आदेश देण्यात आला.चौकशी समिती द्वारे सदरहु नस्तीची सखोल तपासणी केली असता मुख्याधिकारी यांचे स्वाक्षरी मध्ये प्रथमदर्शनी बनावट असल्याचे आढळून आले तसेच संबधीत कंत्राटदार विजय थोरात यांची दर सादरी करण्याचा टिपणी व करारनाम्याच्या स्वाक्षरीमध्ये तफावत आढळून आल्याचे दिसून आले आहे असा अहवाल मुख्याधिकारी पंकज गावंडे यांना सादर करण्यात आले असल्याचे रजनीकांत डालूरामजी बोरेले यांना दि.२८/०४/२०२६ रोजी शिवांगी एस.राऊत माहिती अधिकारी हिने अपील आदेशा नंतर पुरविलेल्या माहितीत सिद्ध झाले आहे. महत्वाची बाब म्हणजे आर्थिक ग़ैरप्रकार करण्याचे कट रचने, खोटे कागद पत्र तयार करने,पंकज गावंडे, मुख्याधिकारी यांची खोटी स्वाक्षरी करने, अश्या गंभीर प्रकरणात मुख्याधिकारी, यांनी फौजदारी गुन्हा नोंदविला नाही.हया गंभीर प्रकरणात कनिष्ठ लिपक पासून ते मुख्याधिकारी पर्यंत सह आरोपी होतात त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी लगेच सरकार तर्फे फिर्यादी म्हणुन गुन्हा दाखल करावे आणि संबधीत सर्व दोषी यांनी अटक करुण निलंबित करावे आणि संबधीत दोषी या पूर्वी कुठे - कुठे कार्यरत होते आणि कोन-कोन ते काम त्यांचे विभागात करण्यात आले त्या सर्व कामाची तपास गुन्हे अन्वेषण भरारी पथक,आणि लाचलुच प्रतिबंधक विभाग मार्फत करण्यात यावी अशी मागणी रजनीकांत बोरेले हे करीत आहे विशेष म्हणजे कल्याणी दि.सोळंके यांच्या दोन प्रसूती बाबतच्या मेडिकल/सुट्टी, पगार,आणि इतर माहिती करीता दोन अपील आणि एक महितीचा अर्ज पुन्हा रजनीकांत बोरेले यांनी नगर परिषद ला दाखल केले आहे.

# आर.पी.पी. कंपनीचे दुर्लक्ष: अलिबाग-चौल रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य,कोंडीमुळे अपघात नागरिक त्रस्त!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : एमएसआरडीसी-आर.पी.पी. जोडीचा घोटाळा?: निकृष्ट काम, अपघात वाढले, शासन कधी जागे होईल?पंधरा दिवसांचा खोटा आस्वास, धूल डोंगर उभा; अपघात वाढले, पावसाळ्यात जीवितहानीचा धोका!आर.पी.पी. कंपनीकडून अलिबाग-चौल रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामामुळे सध्या या परिसरात धुळीचे प्रचंड साम्राज्य पसरले आहे. एमएसआयडीसी आणि एमएसआरडीसीच्या या प्रकल्पांमुळे स्थानिक रहिवासी, प्रवासी आणि पर्यटक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. नियमित पाण्याची फवारणी न केल्याने धुरळा नियंत्रणाबाहेर गेला असून, श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ आणि अपघातांचे प्रमाण वाढले आहे.



नागरिकांच्या आरोग्याला धोका: दिवसभर धुळीचे लोट उठत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रस्त्यालगत राहणारे रहिवासी सर्वाधिक त्रस्त आहेत. सर्दी, खोकला, कफ, धाप लागणे यांसारख्या तक्रारी वाढल्या आहेत. कच्च्या रस्त्यांवर माती-खडी टाकल्याने धुळीचे प्रमाण आणखी गंभीर झाले आहे.

अपघात आणि वाहतूक कोंडी: अनेक ठिकाणी रस्ते खोदून एकेरी वाहतूक सुरू असल्याने मोठी वाहतूक कोंडी होत आहे. धुळीमुळे समोरचे दिसत नसल्याने अपघातांचा धोका वाढला असून, छोटे-मोठे अपघात घडले आहेत. काही अपघातांत जीवितहानी झाल्याची चर्चा असली तरी त्याची योग्य माहिती समोर आलेली नाही. चौल, मुखरी गणपती, बागमळा, सागमळा या भागात अनेक ठिकाणी कामे अर्धवट आहेत. पावसाळा तोंडावर असताना ही कामे पूर्ण झाली नाहीत तर पाण्याला वाट न मिळाल्याने गावांमध्ये, गल्ली-वाड्यांमध्ये पाणी शिरून जीवित-वित्तहानी होण्याचा गंभीर धोका आहे.

उन्हाळी पर्यटन हंगामात अलिबाग-नागाव-रेवदंडा-मुरूड मार्गावर पर्यटकांची मोठी वर्दळ असते. मात्र धूळ, खड्डे आणि वाहतूक कोंडीमुळे पर्यटक हैराण होत असून, स्थानिक पर्यटन व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे. एमएसआरडीसीचे वरिष्ठ अभियंता बी.के. सिंग यांनी आर.पी.पी. कंपनीच्या इन्चार्ज मारी यांच्याशी संपर्क साधून काम पूर्ण होण्याबाबत विचारणा केली. त्यावर "पंधरा दिवसांत काम पूर्ण होईल," असे सांगितले गेले. मात्र नागरिकांच्या मते असे आश्वासन पूर्वीही देण्यात आले; प्रत्यक्षात मात्र त्रास कायम आहे.

निकृष्ट दर्जाचे काम: काही ठिकाणी थर्ड क्लास दर्जाची कामे झाल्याची चर्चा आहे. अशा निकृष्ट कामांचे दोन वर्षही टिकण्याची शक्यता नसल्याचे नागरिक सांगत आहेत.

नागरिकांचा संताप: "रोज दोन-तीन वेळा पाण्याचा मारा करा, धुळीवर कायमस्वरूपी उपाय करा, सुरक्षित वाहतूक व्यवस्था करा," अशी मागणी नागरिक करत आहेत. प्रशासन आणि ठेकेदारांच्या दुर्लक्षामुळे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यटन व्यवसाय धोक्यात आल्याचा आरोप होत आहे.

राजकीय पातळीवर प्रश्न: महाराष्ट्र शासन, रायगड जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्राताई पवार यांच्यावर जनतेच्या आरोग्य-सुरक्षिततेची जबाबदारी नसल्याचा सवाल उपस्थित होत आहे.

नागरिकांचा इशारा: "आर.पी.पी. कंपनीने आणि एमएसआरडीसीने पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण केली नाहीत तर होणाऱ्या जीवित-वित्तहानीची जबाबदारी कोण घेणार?" अशी प्रश्नचिन्हे उपस्थित करत नागरिकांनी शासनावर दबाव वाढवला आहे.

# वाई येथे श्री गुरुदेव सर्वांगीण बाल सुसंस्कार' शिबिराचा उत्साहात प्रारंभ !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : :भावी पिढीवर उत्तम संस्कार व्हावेत आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उदात्त हेतूने श्री विठ्ठल रखुमाई मंदिर वाई ता.आकोट जिल्हा अकोला येथे दि ५ मे २०२६ पासून श्री गुरुदेव सर्वांगीण बाल सुसंस्कार' शिबिराचा अतिशय उत्साहात प्रारंभ झाला. या शिबिराच्या माध्यमातून मुलांच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचला जाणार आहे.

सर्वप्रथम कार्यक्रमाचे उद्घाटन रवींद्र मुंडगावकर अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, केंद्रीय प्रतिनिधी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश कराळे वाई, राहुल कराळे वाई,अतुल शेंडे (कॅप्टन) दिवठाणा,सचिन भुस्कट आकोट,ह.भ.प. रामकृष्ण महाराज इंगळे, पुंडलीकराव अस्वार गुरुजी अकोली जहाँ. यांची प्रमुख उपस्थिती होती.अतुल शेंडे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की "आजच्या धावपळीच्या युगात मुलांवर नैतिक आणि सांस्कृतिक संस्कार होणे काळाची गरज आहे." तसेच रवींद्र मुंडगावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की तुकडोजी महाराज आपल्या सदगुरूनाच विठ्ठल मानतात आणि त्यांनी रचलेली ग्रामगीता ही केवळ स्वतःची नसून सदगुरू च्या कृपेचा ठेवा आहे, असे नम्रपणे सांगतात. ग्रामगीता म्हणजे केवळ ग्रंथ नसून तो सदगुरूच्या कृपेचा विस्तार आहे. त्यांनी अध्यात्म



आणि जीवनकौशल्ये यांची सांगड घालत मुलांचे मार्गदर्शन केले.या शिबिरात सहभागी मुलांसाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत, ज्यात प्रामुख्याने योग आणि प्राणायाम,शारीरिक स्वास्थ्यासाठी.नैतिक मूल्ये ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांवर आधारित संस्कार. बौद्धिक खेळ ,स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढवण्यासाठी.सांस्कृतिक कार्यक्रम, कलागुणांना वाव देण्यासाठी या शिबिराचे आयोजन केले आहे. "आजच्या डिजिटल युगात मुले मैदानी खेळ आणि आपल्या संस्कृतीपासून दूर जात आहेत. त्यांना पुन्हा मुळांशी जोडण्यासाठी आणि एक सुजाण नागरिक घडवण्यासाठी हे शिबिर एक महत्त्वाचे माध्यम ठरेल," असे आयोजकांनी यावेळी व्यक्त केले.शिबिराच्या पहिल्याच दिवशी मुलांचा, पालकांचा आणि गावातील व परिसरातील मंडळी चा मोठा प्रतिसाद पाहायला मिळाला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्ते आणि श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

# एसटी विभागीय कार्यालयावर आझाद समाज पार्टीची धडक

## आंबेडकरांच्या बॅनरवरील चुकीवर तात्काळ कारवाई

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा -** आझाद समाज पार्टी (कांशीराम)च्या पदाधिकाऱ्यांनी ५ मे २०२६ रोजी एसटी विभागीय कार्यालय भंडारा येथे धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या शुभेच्छा बॅनरवर त्यांच्या प्रतिमेला भगवा फेटा दाखवण्यात आल्याचा प्रकार समोर आला.

या घटनेमुळे संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास ही गंभीर चूक आणून दिली. संबंधित अधिकारी माननीय कानफाडे



यांनी तत्काळ चूक मान्य करत “आजच बॅनर काढून टाकतो” असे आश्वासन दिले.या वेळी ग्यानचंद जांभूळकर (पूर्व विदर्भ सचिव), अश्विन गोस्वामी (महासचिव), डॉ. रवींद्र जनबंधू (सचिव) यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये दहा दिवसीय श्रामनेर प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-प्रकाश गवारे** :भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा नांदेड उत्तर यांच्या वतीने आयोजित दहा दिवसीय श्रामनेर प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात नालंदा बुद्ध विहार, भीमघाट येथे पार पडला. हे शिबिर ४ मे ते १३ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा सरचिटणीस दामोदर सरकटे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास भंते शिलारत्न थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रारंभी तथागत भगवान बुद्ध, सम्राट अशोक व डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या प्रतिमांना दीप, धूप व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर भंते शिलारत्न थेरो यांनी शिबिरार्थींना प्रवज्जा देऊन शिबिराची औपचारिक सुरुवात केली. या प्रसंगी संघनायक भंते आनंद (लक्ष्मण कांबळे, केंद्रीय शिक्षक, लातूर) यांचीही उपस्थिती लाभली. शिबिरात एकूण १९ शिबिरार्थी सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा संस्कार उपाध्यक्ष सुरेश लोकडे यांनी भूषविले. प्रास्ताविक बाबुराव सोनकांबळे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुभाष नरवाडे यांनी केले.

यावेळी हौसाजी वारघडे, रेखाताई पंडित, बी.डी. कांबळे, नागराज कांबळे, सुरेश गजभारे, सा.ना. भालेराव, आनंद झडते, कृष्णा गजभारे, जनार्दन जमदाडे, सदाशिव हनुमंते, रविकिरण जोंधळे, बळीराम कसबे, लताताई शिंदे, कुसुमताई बुक्तरे, एस.एन. सोनकांबळे, प्रकाश जोंधळे, शंकर तारू, चंद्रकांत लोखंडे, सुभाष लोखंडे यांच्यासह जिल्हा, तालुका व शहर शाखेचे पदाधिकारी तसेच उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# ठा .म .पा . च्या प्रभाग २९ मधील पाण्याच्या समश्येवर नगरसेविका सौ .वेदिका पाटील यांनी अधिकाऱ्यांसोबत घेतली महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**दि.६, दिवा(ठाणे):ठाणे महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे उपनगर अभियंता श्री. पवार साहेब, कार्यकारी अभियंता श्री. साळुंखे साहेब दिवा प्रभाग समिती ( पाणी पुरवठा विभाग) व कार्यकारी अभियंता श्री. कुलकर्णी साहेब मुंब्रा प्रभाग समिती ( पाणी पुरवठा विभाग) यांच्या समवेत प्रभाग क्रमांक २९ मधील विविध पाणीपुरवठा विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीत नगरसेविका सौ वेदिका साहिल पाटील यांच्या उपस्थितीत खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली:

भोलेनाथ नगर, खार्डी गाव निर्मल नगरी परिसरातील अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत उपाययोजना करून पाण्याचा दाब वाढविणे



दिवसेंदिवस कमी होत चाललेल्या पाणीपुरवठा वेळेत वाढ करण्याबाबत मागणी करण्यात आली. कल्याणफाटा ते वाय जंक्शन व खिडकाळी ते कल्याणफाटा या नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा आढावा व कामातील अडचणी जाणून घेत पूर्ण सहकार्याची हमी अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

पडले गाव आणि खार्डी गाव येथे नवीन पाणी साठवण टाकी उभारण्याचा प्रस्ताव देण्यात आला ज्यामुळे पाणीटंचाई दूर होईल MIDC कडून मिळणाऱ्या पाण्याच्या पुरवठा मधे वाढ करण्याबाबत चर्चा करण्यात आली, विविध भागांतील पाणी पाईपलाईन गळती (Leakage) समस्यांवर तातडीने दुरुस्ती व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले, अनेक दिवसा पासून प्रलंबित खिडकाळी येथील पाण्याची टाकी परिसर स्वच्छता करून संरक्षण भिंतीचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात येईल असा विश्वास अधिकाऱ्यांनी दिला आहे. प्रभागातील नागरिकांना सुरळीत, स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा मिळावा या बद्दल सुद्धा अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. समन्वय ठेवून लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्याचा आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

# जनगणनेतून जनकल्याण ' हे ब्रीद साकार करूया - अनुराधा ढालकरी

**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : भारत सरकारकडून देशाची १६ व्या जनगणनेच्या कामास सुरुवात झालेलीआहे.२०२७ मधील ही जनगणना देशातील पहिली डिजिटल जनगणना ठरणार आहे. यामध्ये डिजिटल सेन्सस आणि स्वगणना ही सुविधा प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवून जनगणनेतून जनकल्याण हे ब्रीद साकार करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे मत निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी अनुराधा ढालकरी यांनी केले.




सेलू येथील साईनाट्य मंदिरात दिनांक ३ मे ते ५ मे दरम्यान प्रगणक व पर्यवेक्षक यांचे जनगणने संबंधी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. अनुराधा ढालकरी यांच्या समवेत जिल्हा जनगणना सहाय्यक अधिकारी अल्ताफ मियां यांचीही उपस्थिती होती. फील्ड ट्रेनर म्हणून प्रा.विजय पटारे व प्रा. महेंद्र शिंदे यांनी प्रशिक्षण दिले.सकाळी ९.३० ते ५.३० या वेळेत प्रशिक्षण घेतले जात आहे. अल्पोपहार व दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. एकूण ४९ प्रगणक व पर्यवेक्षक यांची या प्रशिक्षणात उपस्थिती आहे. दिनांक ६ मे ते ८ मे दरम्यान प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पार पडणार आहे.प्रशिक्षण यशस्वितेसाठी सेलू नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा जनगणना चार्ज अधिकारी महेश गायकवाड, जनगणना अतिरिक्त चार्ज अधिकारी विजय शहाणे, सहाय्यक जनगणना अधिकारी नंदकुमार दायमा, पुरुषोत्तम चौबे, हर्षवर्धन शिंदे, अक्षय कदम, अन्सार रंगरेज, आनंद काबरा आदी कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# परतूर येथे 'दैनिक युवक आधार'ची संवाद बैठक

## संपादक संतोष आमले यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांचा मेळावा







**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके):** दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांच्या प्रमुख उपस्थितीत आज परतूर येथे वृत्तपत्राची विभागीय संवाद बैठक पार पडली. ग्रामीण पत्रकारिता बळकट करणे आणि प्रतिनिधींच्या समस्या जाणून घेणे हा बैठकीचा मुख्य उद्देश होता.

या बैठकीस सहसंपादक मुकुंद कांबळे, कार्यकारी संपादक जगन्नाथ रासवे, उपसंपादक राजू शिंदे यांच्यासह मुंबई विभागाचे संपादक किशोर गुढेकर, कोकण विभागाचे संपादक विजय दूंद्रेकर, जालना जिल्हा प्रतिनिधी अशोक ठोके, घनसावंगी तालुका प्रतिनिधी एकनाथ जाधव,मंठा तालुका प्रतिनिधी नामदेव मंडपे, मंठा ग्रामीणचे पत्रकार अमोल जोशी तसेच सेलू परभणी चे दैनिक युवक आधारचे पत्रकार उपस्थित होते. पनवेल तालुका प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील आणि बीड जिल्हा प्रतिनिधी मारुती सत्रे यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

**बैठकीतील प्रमुख मुद्दे:**

संपादक संतोष आमले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "डिजिटल युगातही ग्रामीण भागातील खरी व परखड पत्रकारिता टिकवणे ही आपली जबाबदारी आहे. वाचकांचा विश्वास हेच आपले भांडवल आहे. कार्यकारी संपादक जगन्नाथ रासवे यांनी तालुका व जिल्हा प्रतिनिधींच्या अडचणी समजून घेत त्या सोडवण्याचे आश्वासन दिले.सहसंपादक मुकुंद कांबळे यांनी आगामी काळात 'युवक आधार'चे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. उपसंपादक राजू शिंदे यांनी बातमी संकलनासाठी नव्या तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला.

बीड जिल्हा प्रतिनिधी मारुती सत्रे यांनी स्थानिक प्रश्नांवर सविस्तर भूमिका मांडली. मुंबई व कोकण विभागाच्या संपादकांनी शहरी व ग्रामीण वाचकांचा समतोल साधण्याबत चर्चा केली.

बैठकीच्या समारोपात निर्भीड व निःपक्षपाती पत्रकारितेचा संकल्प करण्यात आला. या बैठकीमुळे सर्व प्रतिनिधींमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून आले. सूत्रसंचालन घनसावंगी तालुका प्रतिनिधी एकनाथ जाधव यांनी केले.

## स्व. मोहनलालजी पुरोहित महाविद्यालयाच्या निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम

### (बारावी विज्ञान शाखेचा ९८.५७टक्के तर कला शाखेचा ९०.३२टक्के निकाल)





**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे /महागाव** : 'स्व. मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, महागाव' या महाविद्यालयाने आपल्या नावाचा लौकिक सार्थ ठरवत यंदाही उच्चांकी निकालाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेच्या निकालात महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असून, महाविद्यालयाचा एकूण निकाल ९६.०३ टक्के लागला आहे.

महागाव येथील स्व.मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान महाविद्यालयाने बारावी च्या दोन्ही शाखांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९८.५७ टक्के तर कला शाखेचा निकाल ९०.३२ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

विज्ञान शाखेत तुषार प्रदिप पवार याने ८७.१७% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान पटकावला.श्रेयस सचिन मुटकुळे- ८१.००% द्वितीय ,सुमेध नारायण जाधव ७९.३३% तृतीय क्रमांक मिळविला तर सोहम गणेश खंदारे - ७९.१७%,युवराज संजय वानखेडे - ७८.३३%कु. विद्या पंकज पवार - ७७.८३% या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले.

कला शाखेत मंगल पंडित राठोड हिने ६७.१७% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला तर कु. सोनाली बलदेव जाधव - ६५.१७% द्वितीय सत्यमेय विजय चव्हाण - ६२.८३% तृतीय क्रमांक पटकाविला.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रितेशभाऊ पुरोहित,प्राचार्य दिपक लक्ष्मण संगेवार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले हे यश चिकाटी आणि मेहनतीचे फळ असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

## विक्रोळी पार्कसाईट येथे भाजपाचा विजयी जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)** : पश्चिम बंगाल,आसाम आणि पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदणीत विजयाचा आनंद विक्रोळी पार्कसाईट जांभळी नाका येथील वॉर्ड क्र .१२३/१२४ भाजपा कार्यालयात भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मिठाई वाटप व घोषणाबाजी करत भाजपा कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.यावेळी भाजपाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कडक पोलीसिंगची सुरुवात! नवे एसपी नितेश खाटमोडे पाटील यांनी घेतला ताबा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आयपीएस अधिकारी नितेश खाटमोडे पाटील यांनी आज, दि. ५ मे रोजी पोलीस अधीक्षक म्हणून अधिकृतपणे पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यात कठोर, पारदर्शक आणि परिणामकारक पोलीसिंगची नवी दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने ३० एप्रिल रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, नितेश खाटमोडे पाटील यांची पुणे येथील अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सवरून वाशिम येथे बदली करण्यात आली आहे. पुण्यातील कार्यकाळात त्यांनी अमली पदार्थांविरोधात धडक कारवाया करून आपली वेगळी छाप पाडली आहे.


पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण आणणे, कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करणे, महिला व बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे आणि अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करणे यावर भर देणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच पोलीस दलात शिस्त, जबाबदारी आणि जनतेशी सुसंवाद वाढवण्यावरही ते विशेष लक्ष देणार आहेत. नवीन पोलीस अधीक्षकांच्या आगमनामुळे पोलीस दलात नवचैतन्य निर्माण झाले असून, जनतेतही सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होण्याची शक्यता आहे. नागरिकांशी विश्वासार्ह संबंध प्रस्थापित करून प्रभावी पोलीसिंग राबवण्याचा त्यांचा मानस असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, वाशिमकरांकडून नव्या एसपींकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात असून, गुन्हेगारीवर आळा घालून जिल्ह्यात सुरक्षित व कायद्याचा धाक असलेले वातावरण निर्माण होईल, अशी आशा व्यक्त होत आहे.

## पनवेल येथे "आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्य ॲक्वेरियम केंद्र" उभारणीसंदर्भात आमदार विक्रांत पाटील यांची मागणी!

### मंत्री नितेश राणे यांचा सकारात्मक प्रतिसाद व विशेष बैठकीचे आयोजन!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** पनवेल सारख्या भौगोलिक महत्त्व असलेल्या व झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात एखादा मोठा पर्यटन दृष्टीने महत्वाचा प्रकल्प असणे आवश्यक आहे या दूरदृष्टीने मा. आमदार विक्रांत पाटील यांनी अर्थसंकल्प अधिवेशन 2026 मागणी केली होती. याविषयावर मंत्री नितेश राणे यांनी प्रस्तावाचे कौतुक करत याविषयाची तातडीने बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते.




आज याविषयाची महत्त्वपूर्ण बैठक मंत्री मत्स्यव्यवसाय श्री. नितेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्या सोबत आयोजित करण्यात आली होती. या बैठकी दरम्यान आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेलचे भौगोलिक महत्त्व व या आंतराष्ट्रीय दर्जाच्या ॲक्वेरियमची आवश्यकता हे विषय विस्तृतपणे माहिती देऊन पटवून दिले. विशेषतः जवळच साकारलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नव्याने होत असलेली तिसरी मुंबई तसेच नैना प्रकल्प यामुळे यासंपूर्ण भागात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे असा ॲक्वेरियमचा प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटनाला चालना देणारा ठरेल. तसेच या प्रकल्पामुळे पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचा अभ्यास, शैक्षणिक संशोधन आणि स्थानिक रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळेल, याचे महत्व आमदार विक्रांत पाटील यांनी पटवून दिले.

या प्रकल्पासाठी लागणारी जागा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या माध्यमातून पनवेल येथील मत्स्य उपकेंद्राच्या ठिकाणी उपलब्ध करून दिली जाणार असून हि जागा गोडे पाणी व खारे पाणी याची उपलब्धता असणारी आहे. तसेच प्रकल्पाच्या पुढील विकासासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभाग पुढील आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याचे बैठकीत ठरले आहे.

या प्रकल्पामध्ये सागरी तसेच गोड्या पाण्यातील विविध जीवसृष्टीचे प्रदर्शन, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ॲक्वेरियम, तसेच पर्यटकांना आकर्षित करणारे "सी लायन शो" यांसारख्या उपक्रमांचा समावेश असणार आहे.

हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जाचा असणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार नियुक्त केले जातील असे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले.या बैठकीस आयुक्त मत्स्य विभाग- श्रीमती प्रेरणा देशभ्रतार, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, कोंकण कृषी विद्यापीठ दापोली चे अधिकारी, इतर तज्ज्ञ आणि जिल्हाधिकारी कार्यालय रायगड चे अधिकारी उपस्थित होते.पनवेलच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचा विश्वास मा. आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केला.

## व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात तब्बल ९९३ रुपयांची वाढ

### हॉटेल व्यवसायाला आंतरराष्ट्रीय घडामोडीचा छोटया व्यापाऱ्यांना मोठा फटका

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांची सांगता होताच देशातील व्यावसायिक एलपीजी ग्राहकांना महागाईचा मोठा धक्का बसला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी १ मे २०२६ पासून १९ किलो वजनाच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत तब्बल ९९३ रुपयांची विक्रमी वाढ केली आहे. मात्र सर्वसामान्य नागरिकांना काहीसा दिलासा देत घरगुती वापराच्या १४.२ किलो एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावरील भू-राजकीय तणाव,विशेषतः इस्रायल-इराण संघर्ष आणि 'हॉर्मुझ सामुद्रधुनी' मार्गावरील अडथळ्यांमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. जगातील मोठ्या प्रमाणातील तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक या मार्गाने होत असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात इंधन दर वाढले असून त्याचा थेट परिणाम व्यावसायिक गॅसच्या किमतींवर झाला आहे. मार्च आणि एप्रिलमधील वाढीनंतर मे महिन्यातील ही सलग तिसरी मोठी दरवाढ ठरली असल्याची माहिती भवानीनगर येथील हॉटेल चालक दिपक नेवसे यांनी सांगितले.

Indian Oil Corporation यांनी जाहीर केलेल्या नव्या दरानुसार, दिल्लीत १९ किलोचा व्यावसायिक सिलिंडर २,०७८.५० रुपयांवरून थेट ३,०७१.५० रुपयांवर पोहोचला आहे. मुंबई, पुणे, नाशिकसह दिल्ली, चेन्नई आणि कोलकाता या प्रमुख शहरांमध्येही हे नवीन दर लागू करण्यात आले आहेत. या अभूतपूर्व वाढीमुळे हॉटेल, रेस्टॉरंट,खानावळ, केटरिंग व्यवसाय तसेच छोटे खाद्यपदार्थ विक्रेते आर्थिक संकटात सापडले आहेत. स्वयंपाकाचा खर्च वाढल्यामुळे आगामी काळात खाद्यपदार्थांचे दर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आधीच गॅस पुरवठ्यातील अडचणी आणि वाढत्या खर्चामुळे त्रस्त असलेल्या लघुउद्योजकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. या वाढीव खर्चाचा बोजा ग्राहकांवर टाकण्याशिवाय पर्याय नसल्याची भावना हॉटेल व्यावसायिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान,अचानक झालेल्या या दरवाढीमुळे व्यापारी आणि सणसर भवानीनगर येथील हॉटेल संघटनांनी केंद्र सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सीकेटी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा सेवापूर्ती गौरवदिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या कर्मचारी कल्याण समितीने महाविद्यालयातील मानव्यविद्याशाखेच्या अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव दिन समारंभ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उत्साहात पार पडला. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची प्रमुख उपस्थिती राहिली.

सेवापूर्ती समारोहाची सुरवात संस्थेच्या आदर्शस्थानी असणाऱ्या विभूतींचे प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली, यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचे औपचारिक स्वागत झाल्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना कमर्चारी कल्याण समितीच्या सदस्या डॉ. श्वेता हुंबरवाडी यांनी समितीच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी उपक्रमांचा आढावा दिला तथा समारोहाचे सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा परिचय देत, त्यांच्या संस्थेमधील २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाचा उल्लेख करत महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख, जिमखाना असोसिएशन, परीक्षा विभाग, नॅक क्रायटेरिया, राष्ट्रीय सेवा योजना, कर्मचारी कल्याण समिती, महिला विकास कक्ष, अश्या जवळपास प्रत्येक महत्वपूर्ण समितींमध्ये दिलेल्या स्पृहनीय योगदानाचा उल्लेख केला.

यानंतर शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकाऱ्यांनी प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या स्मृतींना उजाळा देताना श्री. तानाजी देशमुख, प्रा. हरिभाऊ खरात, डॉ. राजेश येवले, प्रो.डॉ. बाळासाहेब पाटील, प्रो. डॉ. सुधाकर यादव,




प्रो. डॉ. बाळासाहेब आघाव आणि डॉ. राजेंद्र परमार यांनी मनोगते व्यक्त केलीत. यासोबतच प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या सुकन्या सौ. निकिता औटी आणि व्याही श्री. सुभाषराव काळाणे यांनी भावनांची अभिव्यक्ती केली.

समारोहाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांच्या हस्ते प्रा. काकासाहेब ढवळे यांचा सेवापूर्ती झाल्याबद्दल शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, याबरोबरच सत्कारमूर्तींच्या सहचारिणी सौ. वैशाली ढवळे यांचा सत्कार डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. याच बरोबर महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग तथा त्यांच्या आप्तेष्ट मंडळींकडूनही त्यांचा गौरव करण्यात आला.

सत्कार संपन्न झाल्यानंतर सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब ढवळे यांनी आपल्या सेवेच्या कालावधीतील सर्वांनी दिलेली आदरपूर्वक वागणूक, प्रेम आणि शुभेच्छा यांचा स्वीकार करत, आपल्या उत्तरपर भाषणात त्यांनी महाविद्यालय, सहकारी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणा, सातत्य आणि समाजसेवा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून समाजासाठी कार्य करावे, असा संदेश त्यांनी दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी प्रा. काकासाहेब ढवळे यांना भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्याच अपितु हा सेवापूर्ती समारंभ शेवट नसून एका नवीन अध्यायाची सुरवात असल्याचे विधान केले तसेच कुटुंब आणि आरोग्य यांचा सांभाळ व त्यास प्राधान्य देण्याबाबतचा सल्ला दिला.

सेवापूर्ती गौरव दिनाचे अध्यक्ष तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या २७ वर्षांच्या प्रदीर्घ, निष्ठावंत आणि समर्पित कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी नमूद केले की, महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याचा महत्त्वाचा वाटा असतो आणि प्रा. ढवळे यांसारख्या कर्तृत्ववान शिक्षकांमुळेच संस्थेची ओळख अधिक भक्कम होते. सेवापूर्ती हा आयुष्याचा शेवट नसून एका नव्या पर्वाची सुरुवात असून पुढील काळात त्यांनी कुटुंब, आरोग्य आणि समाजसेवेला प्राधान्य द्यावे, असा सल्ला देत त्यांनी अशा गौरव समारंभांची परंपरा पुढेही कायम ठेवण्याचे आवाहन केले.


यावेळी व्यासपीठावर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब ढवळे व त्यांच्या पत्नी सौ. वैशाली ढवळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो.डॉ. बाळासाहेब आघाव, मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो.डॉ. बाळासाहेब पाटील, वाणिज्यशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. सुधाकर यादव, विज्ञानशाखेच्या शाखाधीपती डॉ. ज्योत्स्ना ठाकूर, कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार, शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकारी आणि सत्कार्मुर्तींचे आपेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन आभार राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पनवेल शहर पोलिसांनी केला दीड कोटी रुपयाचा चोरीचा माल हस्तगत; तीन आरोपी गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल जवळील करंजाडे येथे सुरु असलेल्या रेल्वे पुलाच्या नवीन बांधणी संदर्भातील टाटा कंपनीचे ६७ टन स्टीलच्या पार्ट चोरी प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तिघा जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास दीड कोटी रुपयाचा चोरीचा माल हस्तगत आहे .

ठिकाणी टाटा कंपनीचे रेल्वे पुल उभारण्याचे काम सुरु असून तेथील मॅनेजर बिजयकुमार वर्मा ( वय ४८ ) याने भंगारवाला आजीजूल अब्दुल रब रेहमान ( वय ४७ ) याच्याशी परवेज मोहम्मद अली आलव ( वय २९ ) याच्या मध्यस्थीने संपर्क साधून तेथील साईट वरील स्टीलचे पार्ट चोरण्यास



मदत केली व जवळपास दीड कोटी रुपयाचा माल चोरून नेला होता . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती शिंदे , पोहवा परेश म्हात्रे , संदेश म्हात्रे , अमोल पाटील , विनोद देशमुख आधीचे पथक तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या मदतीने शोध घेत असताना सदर माल चोरण्यासाठी जो हायड्रा वापरण्यात आला होता याची माहिती पोहवा परेश म्हात्रे यांना मिळाली त्यानुसार त्याला ताब्यात घेतले असता पुढील माहिती मिळून सदर माल हा धानसर येथे ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन जवळपास दीड कोटी रुपयाचा चोरीचा माल हस्तगत करून आरोपीना ताब्यात घेतले आहे .

## निफाड तालुक्यातील चाटोरी येथे तीन वर्षीय बालिकेवर अत्याचार; आरोपीस तीन दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** पुणे येथील बालिकेवरील अत्याचाराचे प्रकरणावरुन संतापाची लाट उसळत असतांना निफाड तालुक्यातील चाटोरी येथे देखील मजुरीसाठी आलेल्या तीन वर्षिय पिडितेवर एकोणावीस वर्षीय युवकाने अत्याचार केल्याची निंदणीय घटना घडली आहे. निफाड तालुक्यातील चाटोरी शिवारात गेल्या महिनाभरापासुन रणखेडा जि जळगांव येथुन ऊस तोडणीसाठी आलेल्या मजुरासह कूटुंबही आलेले होते. त्याचवेळी तीन वर्षीय पिडितेचे वडील



हे गावी गेलेले असल्याने पिडितेसह तिची आई व मुले चाटोरी शिवारात असतांना दि १ मे रोजी साय ४ पिडीतेला तहान लागल्याने पिडितेची आई पाणी आणण्यासाठी बाहेर गेल्यावर पिडीतेवर संशयित समीर भाऊसाहेब महाले (१९) अत्याचार केला पिडितेची आई पिडितेला पाणी घेऊन आली

त्यावेळी तीने संशयित पिडितेवर कुकर्म करत असतांना पाहिले संशयिताने तेथुन पळ काढला याबाबत सायखेडा पोलिस स्टेशनला पिडितेच्या आईचे फिर्यादीवरुन भारतीय न्याय संहिता ६५(२), बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा ४(२) ,७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संशयित समीर भाऊसाहेब महाले यास अटक करुन निफाडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता त्यास तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे गुन्ह्याचा तपास सपोनि संदीप घुगे करत आहेत.

# विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे दि. 6 ते 8 मे पर्यंत पुण्यात आयोजन

### कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या स्पर्धेसाठी 41 संघ सहभागी होणार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या 47 व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या क्रीडास्पर्धेचे आयोजन बुधवार (दि. 6) ते शुक्रवारपर्यंत (दि. 8) पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये 10 राज्यांतील विविध विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील तब्बल 41 संघ सहभागी होत आहेत.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे 41 संघ आणि सुमारे 538 महिला व पुरुष खेळाडू सहभागी होत आहेत. कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलमध्ये पुरुष संघात लढत होईल तर कबड्डी व खो-खोमध्ये महिला संघांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील अजिंक्यपदासाठी कबड्डीमध्ये पुरुष व महिला गटातील 18 संघ तर खो-खोसाठी 9 संघ सहभागी होत आहेत. तसेच कुस्ती व बास्केटबॉलमध्ये अजिंक्यपदासाठी पुरुष गटामध्ये प्रत्येकी 7 संघांमध्ये लढत होणार आहे.

विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी (दि. 6) सकाळी 9.30 वाजता राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या मुख्य उपस्थितीत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी राज्याच्या क्रीडा आयुक्त सौ. शीतल तेली-उगले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसेच महावितरण, महानिर्मीती, महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळासह अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तर शुक्रवारी (दि. 8) सायंकाळी 5 वाजता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार (महापारेषण) व श्री. राधाकृष्णन बी. (महानिर्मिती) यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षिस वितरणाचा कार्यक्रम होईल.

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनात या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पुणे प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे तसेच उपाध्यक्ष म्हणून मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप (महापारेषण) व अधीक्षक अभियंता श्री. अशोक घाडगे (महानिर्मिती) आणि मुख्य समन्वयक म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके (महावितरण) व श्री. पुरुषोत्तम वारजुरकर (महानिर्मिती) आणि विविध समितीचे प्रमुख व सदस्य कार्यरत आहेत.

## जिल्हाधिकारी श्री योगेश कुंभेजकर यांची श्री शिवाजी विद्यालय येथील NEET परीक्षा केंद्रास भेट



**दैनिक युवक आधार**

**रिसोड.प्रतिनिधी.रणजितसिह. ठाकूर :** नीट (NEET) परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांची तयारीच्या प्रत्यक्ष तपासणीसाठी वाशिमचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर यांनी भेट देत श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वाशिम येथे पाहणी केली. त्यांच्या भेटीमुळे केंद्रावरील तयारीचा सखोल आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी परीक्षा सुरळीत, पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा, सुरक्षा व्यवस्था, बैठकीची मांडणी, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी केंद्रप्रमुख व शिक्षकांना काही महत्त्वपूर्ण सूचना देत परीक्षेच्या अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी दक्ष राहण्याचे निर्देश दिले.श्री. योगेश कुंभेजकर हे कृतिशील, अभ्यासू व लोकाभिमुख निर्णय घेणारे प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वी विविध प्रशासकीय पदांवर कार्य करताना पारदर्शकता, शिस्तबद्धता आणि परिणामकारक निर्णयक्षमतेचा ठसा उमटवला आहे. प्रसंगी त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षक आमदार मा. ॲड. किरणराव सरनाईक यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सरनाईक जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत, त्यांना शुभेच्छा दिल्यात.यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोटार सायकल चोरटयासकडुन चोरीस गेलेली दोन मोटार सायकल केली हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : फिर्यादी श्री. पवन ओमकारलाल धाकड, वय-२६ वर्षे, रा. होस्टेल, गंगाबाई हास्पीटल, गोंदिया यांनी के.टी.एस. रुग्णालय गोंदिया येथे ठेवलेली बजाज कंपनीची ज्युपीटर झेड एक्स स्टार लाईट ब्लु रंगाची मोटार सायकल क्र. आर.जे. ०९/एन.एस.-३४२३ किं.अं. ८०,०००/- रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने दि. ०१/०५/२०२६ चे रात्री ०८.३० वा. ते १०.०५ वा. दरम्यान चोरुन नेल्याचे फिर्यादीचे तक्रारीवरुन पो.स्टे. गोंदिया शहर येथे दि. ०३/०५/२०२६ रोजी अप.क्र. ३६२/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. २०२३ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. पो.स्टे. गोंदिया शहर येथील पोलीस निरीक्षक श्री किशोर पर्वते यांचे मार्गदर्शनात डी. बी. पथकातील पोलीस अंमलदार हे दि. ०३/०५/२०२६ रोजी गुन्हयातील आरोपी शोधकामी पो.स्टे. परिसरात पेट्रोलींग करीत असतांनी गोपनीय सुत्रांकडुन माहीती मिळाली



की, आरोपी नामे सुरेश नेवारे रा. आसोली ता.जि. गोंदिया याने सदर गुन्हयातील मोटार सायकल चोरी केली आहे अशा खबरेवर त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने पो.स्टे. गोंदिया शहर अप.क्र. ३६२/२०२६ क. ३०३ (२) भा.न्या.सं. २०२३ या गुन्हयातील चोरीस गेलेली ज्यूपीटर मोटार सायकल व पो.स्टे. गंगाझरी अप.क्र. २१७/२०२६ क. ३०३(२) भा.न्या.सं. २०२३ या गुन्हयातील चोरीस गेलेली एच.एफ. डीलक्स मोटार सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीस ताब्यात घेवून दोन्ही मोटार सायकल हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी नामे सुरेश भिवा नेवारे, वय ३६ वर्षे, रा. आसोली ता.जि. गोंदिया याचेकडुन १) बजाज कंपनीची ज्युपीटर मोटार सायकल क्र. आर.जे. ०९/एन.एस.-३४२३ किं. अं. ८०,०००/- रु. व २) हिरो कंपनीची एच.एफ. डीलक्स मोटार सायकल एम.एच.३५/ए. एल. ०३६१ किं.अं. ३०,०००/- रु. अशी एकुण १,१०,०००/- रु. ची चोरीस गेलेली दुचाकी वाहन हस्तगत करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगीरी श्री. गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, श्री. अभय डोंगरे, अपर पोलीस अधिक्षक गोंदिया, श्री. साहील झरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन गोंदिया शहरचे पोलीस निरिक्षक श्री किशोर पर्वते, डी.बी. पथकाचे सफौ/कवलपालसिंग भाटीया, पोहवा/सतिश शेंडे, सुदेश टेंभरे, निशिकांत लोंदासे, दिपक राहांगडाले, पोशि/सुभाष सोनवाने, अशोक राहांगडाले, दिनेश बिसेन, मुकेश रावते, प्रमोद शेंडे, सोनु नागपुरे, अजय बोपचे, कुणाल बारेवार, राकेश बंजारे यांनी केली आहे.

# श्री माळी वैभव प्रकाशन संस्थेचे कार्य प्रशंसनीय : खा. बळवंत वानखडे

## 'माळी वैभव' मासिकाच्या विमोचन प्रसंगी गौरवोद्गार; मदतनिधीच्या कार्याचेही कौतुक






उमरेड येथील अनाथ, अपंग, मतिमंद मुलांना मदत

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे /तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर** : "संघटन, सेवा व जागृतीच्या प्रचारार्थ वाहिलेले समस्त माळी समाजाचे महाराष्ट्रातील एकमेव मुखपत्र असलेले 'श्री माळी वैभव' हे गेल्या ४७ वर्षांपासून नवोदित लेखक व कवींना प्रेरणा देत आहे. आजच्या इंटरनेटच्या युगातही आपली वाचकसंख्या कायम ठेवून वाचन संस्कृतीला बळ देण्याचे श्री माळी वैभव प्रकाशन संस्थेचे कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे," असे प्रतिपादन खासदार बळवंत वानखडे यांनी केले.

दर्यापूर येथे 'श्री माळी वैभव' मासिकाच्या विमोचन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खा. वानखडे यांनी प्रकाशन संस्थेच्या सामाजिक कार्याचाही विशेष उल्लेख केला. "प्रकाशन संस्थेच्या वतीने महात्मा फुले दिनबंधू मदतनिधी ग्रुपच्या माध्यमातून सर्व जाती-धर्मातील उपेक्षित व गरजू लोकांना संपूर्ण महाराष्ट्रात आर्थिक मदतीचे कार्य सुरू आहे, ही बाब अत्यंत समाधानाची आहे," असे ते म्हणाले.

**मान्यवरांची उपस्थिती**

या कार्यक्रमास महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त प्राचार्य निळकंठ बोरोळे, प्राचार्य दत्तात्रय रेवस्कर, डॉ. अनिल लोखंडे, जेष्ठ विश्वस्त श्रीधर पवार, अंबादास जावरकर, नांदेड बू. सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष नंदकिशोर मेहरे, राजकुमार गिऱ्हे, संजय गणोरकर, इंजि. अनुप वाठ यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्य संयोजक प्रदीप लांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी प्रमुख गजानन करुले यांनी केले.

'श्री माळी वैभव' हे मासिक गेली ४७ वर्षे अविरतपणे समाजप्रबोधन, साहित्यनिर्मिती व सामाजिक एकोप्याचे कार्य करीत असून, डिजिटल युगातही मुद्रित माध्यमाची ताकद टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरले आहे, अशी भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

# धामणगाव येथील प्रत्येक बाधित कुटुंबाला शासनाची त्वरित मदत - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार :** भिवापूर तालुक्यातील धामणगाव येथे काल सायंकाळी उशिरा लागलेल्या भीषण आगीत अनेक कुटुंबांच्या घरांचे मोठे नुकसान झाले. आज इथे प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक कुटुंबियांकडून व्यथा ऐकून घेतल्या. जळालेल्या घरांची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रत्येक बाधित कुटुंबाला खनिकर्म महामंडळामार्फत २.५ लाख रुपये, राज्य शासनाकडून २३ हजार रुपयांची मदत, तसेच कोराडी श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर संस्थानकडून २० लाख रुपये, अत्यावश्यक भांडी देत असल्याचे राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले.

त्यांनी आज दुपारी तातडीने अर्थ व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जैस्वाल, स्थानिक आमदार डॉ संजय मेश्राम, सरपंच वैशालीताई चौधरी, माजी आ. राजू पारवे, सुधीर पारवे, आनंदराव राऊत, प्रमोद घरडे, उपविभागीय अधिकारी उमेश चव्हाण व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत भेट देवून बाधितकुटुंबियांच्या व्यथा ऐकून त्यांना धीर दिला.

काल रात्री अचानक आलेल्या वादळवाऱ्यात आगीने अनेक घरांना वेढून टाकले. घटना कशी घडली ते पोलीस यंत्रणा पूर्ण तपास करेल मात्र



गावकऱ्यांनी जी एकजूट व धैर्य दाखवत कोणतीही जीवित हानी होवू दिली नाही हे महत्वाचे आहे. संपूर्ण गावकऱ्यांच्या या धैर्याबद्दल आम्ही आभार व्यक्त करतो, त्यांना सलाम करतो या शब्दात त्यांनी शासनाच्या वतीने ऋण व्यक्त केले.

अधिकाऱ्यांशी चर्चा करून मदत व पुनर्वसनाच्या कामांचा आढावाही आम्ही घेतला आहे. नुकसानग्रस्तांना तातडीने दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना सुरू आहेत. यासोबतच अन्नधान्य, जीवनावश्यक साहित्य याचे वाटप आरोग्य शिबिर, पाणी टँकर, विद्यार्थ्यांसाठी पुस्तके व गणवेश, तसेच जळालेल्या कागदपत्रांसाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. ज्यांची घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली त्यांच्या नुकसानी प्रमाणे ही मदत राहील. सर्व घरांचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर नुकसानीच्या प्रमाणात शासन निश्चित मदत करेल असे स्पष्ट करून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या घरबांधणीसाठी मोफत रेती व्यवस्था करू असे सांगितले.

ज्यांच्याकडे अतिरिक्त खोल्या उपलब्ध आहेत त्यांनी आपली घरे बाधित कुटुंबांना तात्पुरती भाड्याने द्यावीत अशी गावकऱ्यांना त्यांनी विनंती केली. प्रशासनाच्या माध्यमातून सर्व बाधित कुटुंबांचे पुनर्वसन तातडीने व प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत दिली जाईल, याची खात्री गावकऱ्यांना त्यांनी दिली.

**नुकसानग्रस्त कुटुंबांना तातडीने दिलासासाठी उपाययोजना**

- खनिकर्म महामंडळामार्फत प्रत्येक बाधित कुटुंबाला घर बांधणीसाठी २.५ लाख रुपयाची मदत
- राज्य शासनाकडून तातडीने २३ हजार रुपयाची आर्थिक मदत
- नागपूर येथील कोराडी श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर संस्थानकडून २० लाख रुपयाची मदत
- उमरेड एमआयडीसीतील कंपन्यांकडून सीएसआर माध्यमातून मदतीचे प्रयत्न
- प्रत्येक कुटुंबाला एक महिन्यापुरते अन्नधान्य व जीवनावश्यक साहित्य
- जखमी गुरेढोरे व जळालेल्या इतर साहित्यासाठी स्वतंत्र मदत
- घरांच्या बांधकामासाठी मोफत रेती
- विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेश देण्याची व्यवस्था
- जळालेली महत्त्वाची कागदपत्रे पुन्हा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिर
- गावात आठ दिवस आरोग्य शिबिर
- पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था

# महिला दिनाचे औचित्य साधून पत्रकार मित्र असोसिएशन तर्फे महिला लोकसेवकांसाठी झाशीची राणी चषकाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही पत्रकार मित्र असोसिएशन, आपला आधार फाउंडेशन, श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टतर्फे महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेतील लकी ड्रा विजेत्यांना सोन्याची नथ, कुलर, चांदीचे नाणे, इस्त्री, पैठणी यासह विविध आकर्षक बक्षिसे लकी ड्रामध्ये दिली जाणार आहेत. शनिवार दिनांक ३० मे २०२६ रोजी सकाळी दहा पासून स्पर्धेला सुरवात होईल. आकर्षक व दर्जेदार बक्षीसांची लयलूट या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला व संघाना करता येणार आहे. दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत महिलांचे गट, महिलांच्या संस्था, लोकसेवक महिला, हाऊसवाईफ महिलांचे संघ सहभागी होतात. बक्षीसांची लयलूट करताना त्याही नविन मैत्रीणींसोबत




आणि अनुभवासोबत बरेच काही या स्पर्धेतून घेउन जातात. या स्पर्धेत विजेत्यांबरोबरच सहभागी प्रत्येक महिलेला असोसिएशनतर्फे भेटवस्तू दिली जाईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १४ मेपर्यंत नावनोंदणीची मुदत आहे. इच्छूकांनी नावनोंदणीसाठी आयोजक कार्याध्यक्ष नितीन जोशी व सहसचिव प्रवीण शेंडे यांच्याशी ९३२०६४६५५५, ९३२११५८०९०, ९३२२२८२२२७ या क्रमांकावर संपर्क साधावा. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य. (अटी व शर्ती लागू ) स्पर्धेचे नियम व अटीमध्ये बदल करण्याचे अधिकार आयोजकांकडे असतील. या स्पर्धेत लोकसेवक महिला संघाना प्रथम प्राधान्य दिले जाईल. प्रथम, द्वितीय व तृतीय संघाच्या सर्व विजेत्या महिलांना पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे पैठणी देण्यात येणार असल्याचे पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक व अध्यक्ष प्रोफेसर एस. क्रिष्णकुमार यांनी सांगितले, तर बक्षिसांमध्ये व स्पर्धेच्या नियमांमध्ये आयत्यावेळी बदल करण्याचे अधिकार सर्वस्वी आयोजकांकडे असतील याची कृपया नोंद घ्यावी.

# पुणे जिल्ह्यातील नसरापुर अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करणाऱ्या नराधमास फाशी द्या,

## मानोविकास चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.श्रीरामवार यांनी राष्ट्रपतींकडे केली मागणी

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर :-** मानवी मनाच्या संवेदनांचा खून करणाऱ्या आणि हृद्य पिळवटून टाकणाऱ्या पुणे जिल्हात असणाऱ्या भोर तालुक्यातील नसरापुर या गांवात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. या गावात एका 65 वर्षीय इसमाने 3 वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना दि.1 मे महाराष्ट्र दिनी उघडकीस आली

बलात्काराच्या या अमानुष घटनेमुळे पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि तिची निर्घणपणे केलेली हत्या या प्रकरणातील चिमुकलीवरील अत्याचाराच्या घटनेचा निषेध करत आरोपीचा खटला ताबडतोब फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून दोषी आरोपीना जाहीर फाशी देण्याचौ मागणी प्रा.दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार राष्ट्रीय अध्यक्ष मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण च्या वतीने महामहिम राष्ट्रपती श्री. द्रौपदी मुर्मूजी यांना. पाठविलेल्या निवेदनात ही मागणी केली आहे.

प्रा.श्रीरामवार यांनी आपल्या निवेदनात या संदर्भात अनेक मागण्या नमूद केल्या आहेत. त्यामध्ये राष्ट्रात - वाढत असलेल्या बलात्काराच्या घटना, बलात्काराच्या प्रकरणासाठी सशक्त न्यायव्यवस्था व कठोर कायदे बनवून दोर्षीना एक महिन्याच्या आत फाशी देण्याची मागणी केली आहे. भोर तालुक्यातील नसरापुर येथील 3वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या नराधमास लवकरात लवकर जाहीर फाशी देण्यात यावी ही प्रमुख मागणी मानोविकास च्या माध्यमातून करण्यात आली. अल्पवयीन मुली व महिलांच्या बलात्कार प्रकरणांची न्यायालयात नित्य सुनावणी, जनतेसाठी पोलिसांचे दायित्व



व पारदर्शकता तपासण्यासाठी सशक्त फास्टट्रॅक ची निर्मिती, बलात्कार संदर्भात पोलिसांच्या कार्यप्रणालीत सुधार, फॉरेन्सिक लायब्ररी व फॉरेन्सिक विभागाच्या कार्यशैली, सशक्त सुधार बलात्कार पिढितासाठी मदत, महिला व बालकांच्या हत्या होत असलेल्या निर्भया फंडाची निर्मिती, फास्टट्रॅक न्यायालयाच्या माध्यमातून बलात्काराची सर्व प्रकरणे ताबडतोब निकाली काढण्यात यावी. अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.

निवेदनाच्या प्रति महामहिम राष्ट्रपती मा.श्री.द्रौपदी मुर्मुजी, पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी जी, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा.श्री. जिष्णू देव वर्माजी, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री.देवेंद्र फडणवीस जी, मा.जिहाधिकारी नांदेड, मा.पौलिस अधीक्षक नांदेड यांना पाठवण्यात आले आहे तसेच मा.तहसिलदार उमरी यांना देखील निवेदन देण्यात आले आहे.

या वेळी उपस्थित मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार , भीम आर्मी नांदेड जिल्हाध्यक्ष स्वप्निल भोसीकर, जिल्हा कोषाध्यक्ष नदीम बेग, मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठानचे धर्माबाद तालुकाध्यक्ष योगेश गुरुलवाड, रामचंद्र देस्टेवाड, प्रकाश वच्चेवार, अमोल बक्केवाड, गणेश वैद्य, बादल सिंग खिच्ची आदी अनेक जण या वेळी उपस्थित होते.

# क्लायमेट अनफिल्टर्ड 2026 सेमिनारमुळे नवी मुंबईत शास्त्रज्ञ आणि नामांकित विद्वान एकत्र

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई, प्रतिनिधी** : भारती विद्यापीठ (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी), व्यवस्थापन अध्ययन विभाग, नवी मुंबई यांनी "क्लायमेट अनफिल्टर्ड 2026" या प्री-कॉन्फरन्स सेमिनारचे यशस्वी आयोजन केले. हा सेमिनार आगामी आंतरराष्ट्रीय परिषद आणि डॉक्टोरल कोलोकीयम – MINDS 2026 (Management Insights and Network of Department of Management Studies) यांचा भाग होता. हा कार्यक्रम ऑस्ट्रेलियातील Southern Cross University यांच्या सहकार्याने खारघर कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आला.

"अनिश्चिततेत टिकून राहणे आणि जुळवून घेणे (Resilience and Adaptability: Thriving in Uncertainty)" या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित हा सेमिनार हवामान बदल, शाश्वतता आणि बदलणाऱ्या धोरणात्मक चौकटींशी संबंधित जागतिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी



एक प्रभावी व्यासपीठ ठरला. या कार्यक्रमात अग्रगण्य शास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्वान सहभागी झाले आणि त्यांनी सखोल चर्चा व आंतरशाखीय संवाद साधला.

या सेमिनारमध्ये प्रख्यात तज्ज्ञ सहभागी झाले होते. त्यामध्ये प्रो. (डॉ.) शशिकला गुरपूर (सिम्बायोसिस लॉ स्कूल, पुणे यांच्या संचालिका आणि सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या विधी शाखेच्या अधिष्ठाता) यांचा समावेश होता. त्यांनी हवामान व्यवस्थापनावर प्रभावी भाषण देत मजबूत धोरणात्मक चौकटी, नैतिक नेतृत्व आणि जागतिक सहकार्याची गरज अधोरेखित केली.

डॉ. आर्ती सोनी (CSIR-NEERI येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ) यांनी शहरी वाहतूक व्यवस्था आणि हरितगृह वायू उत्सर्जन यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी शाश्वत औद्योगिक आणि वाहतूक पद्धतींद्वारे कार्बन फूटप्रिंट कमी करण्याची गरज स्पष्ट केली. त्याचबरोबर डॉ. अदिती मोदी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरॉलॉजी) यांनी हवामान मॉडेलिंगवर सत्र घेतले आणि डेटा-आधारित अंदाज पद्धतींचे महत्त्व स्पष्ट केले.

या सेमिनारमध्ये शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. हा कार्यक्रम ज्ञानवाटप, बौद्धिक चर्चा आणि अर्थपूर्ण विचारमंथनासाठी एक प्रभावी मंच ठरला. या सत्रांमुळे सहभागींचे हवामान व्यवस्थापन, उत्सर्जन गती आणि भविष्यवाणी मॉडेलिंग याविषयीचे आकलन अधिक सखोल झाले.

एकूणच, "क्लायमेट अनफिल्टर्ड 2026" हा एक उल्लेखनीय शैक्षणिक उपक्रम ठरला, ज्याने जटिल संकल्पना प्रभावी चर्चेत रूपांतरित केल्या. आयोजकांनी हवामान विषयक चर्चेला पुढे नेण्याचा आणि कृतीयोग्य कल्पनांना चालना देण्याचा आपला निर्धार पुन्हा दृढ केला.

हा कार्यक्रम डॉ. प्रेमाशीष रॉय (संचालक, व्यवस्थापन अध्ययन विभाग आणि व्यवस्थापन संकुलाचे अधिष्ठाता) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. त्यांच्या सक्षम नेतृत्वामुळे कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शक्य झाले. या सेमिनारचे संकल्पन आणि आयोजन श्रीमती सुरभी सातेश यांनी केले आणि समन्वय सहाय्यक प्राध्यापिका श्रीमती अर्चना साकुरे यांनी केले

# ज्ञान देणारे हात कधीच थकत नाहीत - डॉ. मनीषा निंबार्ते

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे / लाखनी** - लाखनी येथील पी. एम. श्री जिल्हा परिषद गांधी कनिष्ठ महाविद्यालयात दोन ज्येष्ठ शिक्षक श्री केशव चोले आणि सौ. उर्मिला टीचकुले यांच्या सेवापूर्ती निमित्त भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. मनीषा निंबार्ते यांनी "ज्ञान देणारे हात कधीच थकत नाहीत, शिक्षक हा आयुष्यभर समाज, देश आणि विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करत असतो," असे प्रेरणादायी प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. रवी मेश्राम होते. त्यांनी दोन्ही शिक्षकांनी दिलेल्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेसाठी त्यांचे अभिनंदन करून




त्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी गट शिक्षणाधिकारी श्री सुभाष बावनकुळे यांनी शिक्षकाच्या भूमिकेवर भाष्य करताना सांगितले की, "कुंभार जसा मातीला आकार देतो, त्याप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनाला आत्मज्ञान, प्रेम आणि आपुलकीची जोड देत त्यांना घडवत असतो.

विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडविण्यात शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता दोनोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोपाल लांजेवार यांनी मानले. यावेळी प्रा. आय. बी. चौहान, प्रा. के. एम. वैद्य, प्रा. विलास पुर्णे, प्रा. आर. वाय. खोब्रागडे, डी. एन. गिरहेपुंजे, मरसकोल्हे, शशी शेंडे, प्रा. गीता प्रधान, प्रा. मादणकर, प्रा. भैसारे, प्रा. मेघा धांडे, प्रा. मेघा बावणे, शीतल मौदेकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला असून, उपस्थितांनी त्यांच्या कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# रहिमतपुर येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारणार - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## रहिमतपुर परिषदेच्या शताब्दी वर्ष सोहळयात केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे सह संपादक**

**सातारा :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सातारा जिल्हयातील रहिमतपुर येथे 5 मे 1926 रोजी तत्कालीन महार परिषद आयोजित केली होती. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रहिमतपुर येथे आले होते. रहिमतपूर मध्ये ते ज्या ठिकाणी थांबले होते तेथे भव्य समता स्तंभ उभारण्यात आलेला आहे. तेथे आज ना. रामदास आठवले यांनी भेट दिली.

5 मे 1926 रोजी रहिमतपुर येथे ही परिषद महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी जनजागृतीचा मानवमुक्तीचा लढा सुरु केला, त्याचा भाग म्हणून महार परिषद रहिमतपुर येथे 5 मे 1926 रोजी घेण्यात आली होती. त्यास 100 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल शताब्दीपूर्ती महोत्सव आज रहिमतपुर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात ना. रामदास आठवले प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रहिमतपुरच्या या समता स्तंभाजवळ महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल असे आश्वासन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज दिले. यावेळी कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे, रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक बापु गायकवाड,




भाजपच्या राज्य उपाध्यक्षा चित्रलेखा माने, रहिमतपुरच्या नगराध्यक्ष वैशाली माने ; मयुर बनसोडे आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या ज्या ठिकाणी गेले त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्याची योजना महाराष्ट्र राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागाची आहे. त्यानुसार रहिमतपुरमधील महार परिषदेच्या शताब्दी वर्षानिमीत्त रहिमतपुरच्या समता स्तंभाजवळ महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्यात येईल. त्यासाठी आपण केंद्र सरकारकडुन मदत मिळवून देऊ. याठिकाणी भव्य भिम स्मारक उभारण्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही.त्यादृष्टीने आपण प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन ना. रामदास आठवले दिले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले भारताचे संविधान जगातील सर्वात सर्वश्रेष्ठ संविधान आहे. सर्व जाती धर्मियांचे संविधान आहे. सर्वांना न्याय देणारे संविधान आहे. या संविधानाला ज्यांनी कोणी बदलण्याचा विचार करू शकत नाही. जर बदलण्याचा कोणी विचार केला तर त्यांना आमची आंबेडकरी जनता फाडुन टाकल्याशिवाय राहणार नाही. असा इशाराही ना. रामदास आठवले यांनी यावेळी दिला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष हा देशभर मी पोहचवला आहे, नागालॅन्ड आणि मणिपुरमध्ये रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळाली आहे. आणखी दोन राज्यांमध्ये 6 टक्के मते मिळाली तर रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यतेचा दर्जा मिळेल. सध्या देशात भाजप, कॉंग्रेस, बसपा आणि आम आदमी पार्टी हे प्रमुख राष्ट्रीय पक्ष आहेत. पाचवा राष्ट्रीय पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाला अधिकृत मान्यता मिळेल. असा विश्वास ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

सता-यामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण झालेले आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मातोश्री भिमाई यांचे स्मारक सातारा येथे आहे.. सातारा जिल्हा आंबेडकरी चळवळीसाठी ऐतिहासिक आहे.5 मे 1926 ला रहिमतपूर येथे आयोजित केलेल्या महार पषिदेला आज शंभर वर्ष होत आहेत. या शताब्दी वर्षानिमीत्त रहिमतपुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीची चळवळ उभी केली, त्यांना दलित सवर्ण हा जातीभेद मिटवायचा होता. जातीभेद मिटवुन सामाजिक ऐक्य साधणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्दीष्ट होते. जातीभेद निर्मुलन करुन समाजात समता निर्माण करण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. तीच प्रेरणा घेऊन आपणही काम करीत आहोत, समाजात जातीभेद नष्ट करुन सामाजिक समता, दलित सवर्ण हा भेद मिटवुन सामाजिक एकजुट उभी करण्यासाठी आपण प्रयत्न करु असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी यावेळी केले.

---

**संक्षिप्त**

### रूम देतो असे सांगून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** रूम न देता पैसे देखील परत न केल्याप्रकरणी आरोपी मोहम्मद अरिफ (राहणार नेरूळ), मोहम्मद तजमुल अन्सारी (राहणार कळंबोली), जगत नारायण जवाहरलाल कश्यप (राहणार कल्याण), अशपाक सिकंदर मुजावर (राहणार कळंबोली) यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात चार मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.आरोपींनी एचडीएफसी बँकेने सील केलेले रूम विक्री करण्याचे अधिकार दिलेले नसताना सुद्धा तीन ऑक्टोबर २०२५ ते चार मे २०२६ पर्यंत फिर्यादी मोहम्मद सलमानी (राहणार रोडपाली सेक्टर 17) यांना एचडीएफसी बँकेचे सील लागलेला रूम देशमुख ब्लासम, ओवेगाव, खारघर हा दाखवला आणि तो रूम कमी किमतीत मिळवून देतो असे सांगून त्यांच्याकडून टोकन म्हणून चार लाख 11 हजार रुपये ऑनलाईन स्वीकारले तसेच फिर्यादी यांच्या ओळखीचे प्रदीप गुप्ता (राहणार कळंबोली) रामभवन जैस्वार आणि उमेश जैस्वार (राहणार तुर्भे) यांना सुद्धा कळंबोली येथे बँकेने सील केलेल्या रूम कमी किमतीत मिळवून देतो असे सांगून त्यांच्याकडून अनुक्रमे दोन लाख आणि आठ लाख रुपये ऑनलाईन स्वीकारले आणि तिघांची एकूण 14 लाख 11 हजार रुपयांची फसवणूक केली. त्यांना रूम देखील दिला नाही आणि पैसेही परत केले नाहीत.

### अश्लील हातवारे करून महिलेचा केला विनयभंग

**दैनिक युवक आधार**

**नवीन पानवेल वार्ताहर :** रिक्षामध्ये पाठीमागे बसलेल्या अनोळखी इसमाने दोन महिलांचा विनयभंग केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात चार मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी आणि त्यांची बहिण ही भाजी खरेदी करण्यासाठी गेले असता रिक्षा क्रमांक एम एच 46 1466 (पूर्ण क्रमांक नाही) मध्ये पाठीमागे बसलेल्या अनोळखी इसमाने फिर्यादीच्या बहिणीला डोळा मारून अश्लील हातवारे केले आणि स्वतःकडे बोलावून तिचा विनयभंग केला. यावेळी फिर्यादी ह्या विचारणा करण्यासाठी गेले असता आरोपीने रिक्षामध्ये बसण्यास सांगून त्यांचा देखील विनयभंग केला.

### अल्पवयीन मुलींची छेड काढल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तीन अल्पवयीन मुलींची छेड काढल्या प्रकरणी आरोपी पंकज अजयसिंग सिंग (राहणार कामोठे सेक्टर 15) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात चार मे रोजी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यातील सहा वर्षीय, सात वर्षीय आणि नऊ वर्षीय पीडित मुली कामोठे येथे राहत असून आरोपी पंकज सिंग (वय 28) याने तिन्ही मुलींची छेड काढली. याची माहिती कुटुंबीयांना दिल्यानंतर आरोपी विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

---

# आर्यारवी एंटरटेनमेंटच्या चौथ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात "सात बारा", "साथ" आणि "जागा" यांनी मारली बाजी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई:(केतन भोज)** : लघुपटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'आर्यारवी एंटरटेनमेंट' आयोजित चौथ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात यावर्षी प्रथम पुरस्कार रोख रक्कम रुपये 15000/- म्हणुन कै.भिकाजी महादेव तेटांबे, कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ पारंबी प्रॉडक्शन आणि भक्ती प्रॉडक्शन निर्मित "सात बारा', द्वितीय पुरस्कार रोख रक्कम रुपये 10000/- म्हणुन (स्टार इंजिनिअरिंग एन्ड मेकॅनिकल सर्विसेस) एअर कंडीशनिंग एन्ड रेफ्रिजरेशन सिस्टम जॉब यांच्या सौजन्याने बटवा फिल्म्स "साथ" तर तृतीय पुरस्कार रोख रक्कम रुपये 5000/- म्हणुन कै.सावित्रीबाई गुणाजी कोकाटे यांच्या स्मरणार्थ बटवा फिल्म्स "जागा" यांनी पटकावली आहेत. त्याचप्रमाणे




उत्तेजनार्थ लघुपट पुरस्कार रोख रक्कम रुपये 1000/- म्हणुन कै.गीता आनंदा जाधव यांच्या स्मरणार्थ "साकव" आणि "चुना तंबाखु" यांना प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे कै.शामराव नारायण व्हटकर, कै.हौसाबाई शामराव व्हटकर यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रोख रक्कम रुपये 1000/- आणि पुरस्कार अक्षय वासकर (दिग्दर्शन-सात बारा), राहुल यशोद,अक्षय वास्कर (कथा,पटकथा,संवाद लेखन-सात बारा), मकरंद पांचाळ (छायाचित्रण-जागा), स्मित भगत (बाल कलाकार-चुना तंबाखू), पिंटू पाटील (अभिनेता-सात बारा), श्रेयस भिंगार्डे (संकलक-साकव), शीतल कुलकर्णी (अभिनेत्री-सात बारा), पवन वडूरकर (संगित-सात बारा) इत्यादींना प्रदान करण्यात आले. लघुपट परीक्षणाची सर्वोत्तम जबाबदारी प्रसिद्ध लेखक,दिग्दर्शक अनंत सुतार आणि प्रसिद्ध अभिनेते मकरंद पाध्ये यांनी बजावली. चित्रपट, नाट्य आणि साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीने या सोहळयाला विशेष झळाळी प्राप्त झाली होती. या महोत्सवात गझल नवाज भीमराव पांचाळे, ज्येष्ठ अभिनेते,दिग्दर्शक सतीश पुळेकर, ज्येष्ठ रंगकर्मी, नाट्य अभिनेते, दिग्दर्शक के राघव कुमार आणि ज्येष्ठ समाजसेवक,पत्रकार प्रभाकर तोडणकर या दिग्गजांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले: कवी शब्दश्री विलास देवळेकर यांनी सादर केलेल्या भारदस्त 'गाऱ्हाण्याने' सोहळयाची मंगलमय सुरुवात झाली. आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला, तर एका व्हिडिओ फितीच्या (AV) माध्यमातून या सोहळयाचा तीन वर्षांचा प्रवास उलगडण्यात आला. याप्रसंगी गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी गझल गाऊन उपस्थित मान्यवर आणि रसिकांची दाद मिळवली. यावेळी रंगकर्मी, समाजभूषण आणि कलाभूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. प्रसिद्ध अभिनेते व मुलाखतकार मयूर धुरी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर अभिनेते कांचन पगारे, समाजसेवक सुनिल शिर्के, अभिनेत्री सिद्धी कामथ, गुरुनाथ तिरपणकर, उद्योजक खलील शिरगावकर, लेखक-दिग्दर्शक अनंत सुतार आणि अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महेश्वर तेटांबे यांनी भावूक होत सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, "चांगला स्वभाव हा गणितातल्या शून्यासारखा असतो; त्याला स्वतःला किंमत नसते, पण दुसऱ्यासोबत जोडला तर त्याची किंमत वाढते. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच हा प्रवास इथवर पोहोचला आहे." राष्ट्रगीताने या सोहळयाची सांगता झाली

---

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!

आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०४ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळयासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण



विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळयासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**

# ठेकेदारांचा खेळ की योजनेंतर्गत घोटाळा?” – अधीक्षक अभियंत्यावर गंभीर आरोप; वाशिममध्ये ‘सुशिक्षित बेरोजगार अभियंता’ योजना वादाच्या भोवऱ्यात!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम,४ मे जिल्ह्यातील “सुशिक्षित बेरोजगार अभियंता” योजनेत निधी वाटप आणि कामांच्या वितरणात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. म.रा.वी.वी.कं. मर्या., वाशिम येथील अधीक्षक अभियंत्यांवर स्वतःच्या निकटवर्तीय ठेकेदारांना जाणीवपूर्वक लाभ मिळवून दिल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते विजय (विजू) लाडुकर आणि प्रताप नागरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल केली असून, संपूर्ण प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, ही बाब केवळ नियमभंगापुरती मर्यादित नसून, संपूर्ण योजनेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे.

शासनाने ही योजना बेरोजगार अभियंत्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केली असली, तरी प्रत्यक्षात काही निवडक ठेकेदारांनाच वारंवार कामे देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पात्र आणि गुणवंत अभियंते योजनेंतर्गत संधीपासून वंचित राहत असल्याचे चित्र समोर येत आहे.

तक्रारदारांच्या मते, कामांचे वाटप करताना कोणतीही पारदर्शक यंत्रणा वापरण्यात आलेली नाही. लॉटरी प्रणाली किंवा समान संधीच्या तत्वांचा अवलंब न करता, ठराविक व्यक्तींनाच लाभ मिळेल अशा पद्धतीने निर्णय घेतले गेले. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर संशयाची छाया निर्माण झाली आहे.




विशेष म्हणजे, वरिष्ठ स्तरावरून देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांकडेही दुर्लक्ष झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. अधीक्षक अभियंत्यांची भूमिका संशयास्पद ठरत असून, यामुळे केवळ एका अधिकाऱ्यावरील प्रश्न निर्माण होत नाहीत, तर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्न उपस्थित होत आहेत.

या पार्श्वभूमीवर, तक्रारदारांनी सखोल आणि निष्पक्ष चौकशीची मागणी करत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. तसेच भविष्यात अशा योजना राबवताना पूर्ण पारदर्शकता, नियमबद्धता आणि लॉटरी पद्धतीचा अवलंब अनिवार्य करण्याचीही मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या गंभीर आरोपांमुळे जिल्हा प्रशासनाची विश्वासार्हता पणाला लागली असून, जिल्हाधिकारी कार्यालय या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर वेळेत आणि कठोर पावले उचलली गेली नाहीत, तर “सुरक्षित बेरोजगार अभियंता” ही योजना केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. वाशिममधील हा वाद केवळ एका योजनेपुरता मर्यादित नसून, प्रशासनातील पारदर्शकता आणि विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. आता चौकशी आणि कारवाईवरच या प्रकरणाचा पुढील मार्ग अवलंबून आहे.

# वडखळच्या मातीतील आगरी समाजाची लेक 'विजया' लंडनमध्ये गाजवणार नाव!

## जिद्द, बुद्धिमत्ता आणि संस्कारांची शिदोरी असलेल्या पेणच्या कन्येची मोठी झेप!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** पेण तालुक्यातील वडखळ येथील आगरी समाजाची कन्या विजया प्रशांत मोकल पारेख यांनी आपल्या कर्तृत्वाने सातासमुद्रापार लंडनच्या भूमीत महाराष्ट्राचा गौरव वाढवला आहे. ब्रेंट कौन्सिलच्या 'टोकिंग्टन' प्रभागातून त्या निवडणूक लढवत असून, त्यांच्या या यशामागे वडखळच्या मातीत झालेले संस्कार आणि त्यांची जिद्द कारणीभूत आहे.

विजया या लहानपणापासूनच अत्यंत हुशार आणि अभ्यासू होत्या. वडखळ हायस्कूलमध्ये असताना शाळेच्या प्रत्येक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. शाळेचे स्नेहसंमेलन असो वा इतर कोणतेही कार्यक्रम, विजया नेहमीच हिरीरीने पुढे असायच्या. विशेष म्हणजे, शालेय जीवनापासूनच त्यांनी अनेक मैत्रिणींचे मोठे जाळे विणले, जे आजही तितक्याच प्रेमाने टिकून आहे.

बुद्धिमत्तेची छाप आणि शालेय शिक्षणानंतर पेणचे ज्युनिअर कॉलेज आणि त्यानंतर अलिबागच्या जेएसएम कॉलेजमध्ये त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची छाप पाडली.




रसायनशास्त्रात पीएचडी संपादन केल्यानंतर त्यांनी भारतात 'जनरल मॅनेजर' या उच्च पदावर काम करून आपली कार्यक्षमता सिद्ध केली. सध्या त्या लंडनमध्ये प्रथितयश संशोधन शास्त्रज्ञ, प्रौढ शिक्षिका आणि 'हेल्थ चॅम्पियन' म्हणून कार्यरत आहेत.

सातासमुद्रापार २५ वर्षांपासून ती लंडन येथे वास्तव्यास असूनही विजया आपल्या जन्मगावाला आणि तेथील मातीला त्या विसरलेल्या नाहीत. एवढ्या मोठ्या पदावर असूनही त्यांच्या वागण्यात कुठेही मोठेपणाचा लवलेश नाही आजही वडखळ किंवा भारतातून कुणाचाही फोन आला तर त्या अत्यंत प्रेमाने आणि आपुलकीने संवाद साधतात मित्र-मैत्रिणी आणि नाती जपण्याचे संस्कार त्यांनी आजही मनापासून जपले आहेत.

अत्यंत गोड स्वभाव असलेला विजया यांचे मराठीसह हिंदी, गुजराती आणि इंग्रजी या भाषांवर प्रभुत्व आहे. त्यांच्या या संवाद कौशल्यामुळे त्या लंडनमध्ये विविध समुदायांच्या लोकांशी सहज जोडल्या जातात .या संपूर्ण प्रवासात त्यांचे पती प्रशांत पारेख यांचे त्यांना मोलाचे प्रस्थान आणि खंबीर पाठबळ लाभले आहे.

नावाप्रमाणेच विजया असलेल्या या कन्येने ७ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी कन्झर्व्हेटिव्ह पार्टी कडून लढण्यासाठी तीने कंबर कसली आहे. वडखळचे हायस्कूल पासून सुरू झालेला हा प्रवास आज लंडनच्या राजकीय पटलावर पोहोचला आहे.

सुरक्षित आणि स्वच्छ टोकिंग्टन चे ध्येय उराशी बाळगून लढणाऱ्या विजया यांच्या विजयासाठी सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कोथरूड परिसरात तरुणावर कोयत्याने वार, खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा

**पुणे, प्रतिनिधी :**

वैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना कोथरूडमधील केळेवाडी परिसरात घडली. या प्रकरणी चौघांविरुद्ध पोलिसंनी गुन्हा दाखल केला. आदित्य उर्फ सनी राजू गाडे (वय २१, रा. केळेवाडी, कोथरूड) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गायत्री आदित्य गाडे (वय १९) हिने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गाडे यांच्या नात्यातील एका तरुणीचे आरोपीने पळवून नेले होते. या कारणावरुन गाडे आणि साथीदारांनी आरोपीवर सांगली जिल्ह्यातील आष्टा परिसरात शस्त्राने वार केले होते. या कारणावरुन त्यांच्यात वाद झाले होते. ३ मे रोजी रात्री आदित्य हा कोथरूडमधील केळेवाडी परिसरातून निघाला होता.




त्या वेळी आरोपींनी त्याला अडविले. शिवीगाळ करुन आरोपींनी आदित्य याच्यावर कोयत्याने वार केले. आरोपीने केलेल्या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला.

या घटनेची माहिती मिळताच कोथरूड विभागाच्या सहायक पोलीस आयुक्त सुजाता तानवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक पवार तपास करत आहेत.

वैमनस्यातून तरुणाला मारहाण करुन त्याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालण्यात आला. हडपसरमधील काळेपडळ परिसरात ही घटना घडली. तरुणाचा खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेश संजू बिरादार (वय २५, रा. ससाणेनगर, हडपसर) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बिरादार याची पत्नी अपेक्षा हिने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश बिरादार याची तीन महिन्यांपूर्वी आरोपींशी भांडणे झाले होते. वादातून आरोपी आणि साथीदारांनी हडपसरमधील ससाणेनगर परिसरात ३ मे रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास गणेशला शिवीगाळ करुन त्याला मारहाण केली. त्याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारला.

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन



सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.

त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची, कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवर्गाचे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.

शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.

शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.

आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत.

आरक्षण धोरणांवर आजही मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि वादविवाद होत आहेत. काहीजण आरक्षणाला विरोध करतात, तर काहीजण त्याचे समर्थन करतात. या वादांच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी आरक्षणाला एक तात्पुरती पण आवश्यक उपाययोजना मानली होती, जी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या काळात ‘मेरिट’ या संकल्पनेवरही मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. काहीजण असा युक्तिवाद करतात की, आरक्षणामुळे गुणवत्ता कमी होते. परंतु शाहू महाराजांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, गुणवत्ता ही केवळ जन्मावर अवलंबून नसून, ती संधी आणि संसाधनांवर अवलंबून असते. जेव्हा समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतील, तेव्हाच खरी गुणवत्ता विकसित होऊ शकते. शाहू महाराजांच्या कार्यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, समाजातील परिवर्तनासाठी केवळ कायदे आणि धोरणे पुरेशी नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार केला.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्यायाचे स्वरूप बदलत आहे. नवीन प्रकारच्या विषमता निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला समतेचा आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच लागू आहे. राजर्षी शाहू महाराजांचा स्मृतिदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस असला, तरी तो आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवसही आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.